# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. १०** **// स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त //** **दिनांक २०/०६/२०१९**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि. **२०/०६/२०१९ गुरुवार** रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती **श्री.जितेंद्र भगवान मराठे** यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त.

उपस्थिती नोंदणी रजिष्टरमध्ये स्वाक्षरी करुन खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. श्री.जितेंद्र भगवान मराठे, सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| बालाणी भगतराम रावलमल | सनकत चेतन गणेश |
| ढेकळे सदाशिव गणपत | कापसे मयुर चंद्रकांत |
| बेंडाळे उज्वला मोहन | पाटील प्रतिभा सुधिर |
| अड.हाडा शुचिता अतुलसिंह | लढ्ढा नितीन बालमुकूंद |
| सोनवणे सुरेश माणिक | भंगाळे विष्णू रामदास |
| पोकळे दिलिप बबनराव | बरडे नितीन मनोहर |
| खडके सुनिल वामनराव | बागवान रियाज अहेमद अब्दुल करीम |

सदर सभेस, मा.आयुक्त,डॉ.श्री.उदय टेकाळे मा.उपायुक्त,श्री.चंद्रकांत खोसे, श्री.लक्ष्मीकांत कहार, मुख्यलेखापरिक्षक. श्री. संतोष वाहुळे , नगरसचिव श्री.सुनिल गोराणे उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेची सुरुवात झाली.**

**मा.सभापती :-** नगरसचिव यांनी सभेच्या कामकाजास सुरुवात करावी.

**नगरसचिव :-** सभेला सुरुवात करणेत येत आहे. आजच्या सभेकरिता सन्मा.सदस्य श्री. कोल्हे प्रविण रामदास यांचा रजेचा अर्ज आलेला असुन तो मा.पिठासिन अधिकारी यांनी मंजूर केलेला आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १)** जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील महात्मा गांधी उद्यान व्यवस्था व दुरुस्ती करीता मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टिमस् लिमिटेड यांचे दर सर्वात कमी आलेले असुन त्यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार मक्तेदार महात्मा गांधी उदयान देखभाल व दुरुस्ती करीता ३ वर्षासाठी रक्कम रु.१,२५,००,०००/- मध्ये काम करण्यास तयार असल्याने महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) मधिल तरतुदीनुसार सदरचे दर स्विकृत करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०० पारित करण्यात आला.**

मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत महात्मा गांधी उदयान व्यवस्था व दुरुस्ती करीता खाजगी संस्थेमार्फत कामास महासभा ठराव क्रं.८८३ दि.२३/०३/२०१८ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार शहर अभियंता यांचे व्दारे ई-निविदा मागविण्यात आल्या. अ.क्र.१ ते ३ मक्तेदार यांचे फोल्डर क्रं.-१ व फोल्डर क्र.२ उघडुन मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| निविदा धारकाचे नांव | Sr.N0. | Post Required | No of MiNImum person Required | Offer For Three Year |
|---|---|---|---|---|
| S.P.Enterprises | 1 | Security | 01 | Rs.95,00,000/- |
| | | Office | 01 | |
| | | Supervisor | 09 | |
| | | Guard (Gents) | 07 | |
| | | Guard (Ladies) | 02 | |
| | 2 | Gardening Work | | Rs.30,00,000/- |
| | | Supervisor | 01 | |
| | | Labour (Ladies) | 01 | |
| | | Labour (Gents) | 02 | |
| | 3 | Cleaning Work | | Rs.20,00,000/- |
| | | Labour (Ladies) | 01 | |
| | | Labour (Gents) | 02 | |
| | 4 | Electrician | 02 | Rs.5,00,000/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | 5 | Civil/Electrical Maintenance | Job | Rs.25,00,000/- |
| | | | Total :- | 1,75,00,000/- |
| Jain Irrigation Systems Ltd. | 1 | Security | 01 | Rs.81,45,500/- |
| | | Officer | 01 | |
| | | Supervisor | 09 | |
| | | Guard (Gents) | 07 | |
| | | Guard (Ladies) | 02 | |
| | 2 | Gardening Work | | Rs.20,83,500/- |
| | | Supervisor | 01 | |
| | | Labour (Ladies) | 01 | |
| | | Labour (Gents) | 02 | |
| | 3 | Cleaning Work | | Rs.15,62,600/- |
| | | | | |
| | | Labour (Ladies) | 01 | |
| | | Labour (Gents) | 02 | |
| | 4 | Electrician | 02 | Rs.3,12,500/- |
| | 5 | Civil/Electrical Maintenance | Job | Rs.17,84,900/- |
| | | | Total :- | Rs.1,38,89,000/- |
| Vilas P. Patil | 1 | Security | 01 | Rs.93,67,500/- |
| | | Officer | 01 | |
| | | Supervisor | 09 | |
| | | Guard (Gents) | 07 | |
| | | Guard(Ladies) | 02 | |
| | 2 | Gardening Work | | Rs.23,96,000/- |
| | | Supervisor | 01 | |
| | | Labour (Ladies) | 01 | |
| | | Labour (Gents) | 02 | |
| | 3 | Cleaning Work | | Rs.17,97,000/- |
| | | Labour (Ladies) | 01 | |
| | | Labour (Gents) | 02 | |
| | 4 | Electrician | 02 | Rs.3,59,500/- |
| | 5 | Civil/Electrical Maintenance | Job | Rs.20,52,600/- |
| | | | Total :- | Rs.1,57,92,600/- |

असा ठराव करणेत येत आहे की, वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार जैन इरिगेशन सिस्टीमस् लि. यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा १,३८,८९,०००/- मात्रचे दर सर्वात कमी आलेले आहे. तथापी सदरचे दर जास्त वाटत असल्याने त्यांना शहर अभियंता यांचेकडेस वाटाघाटी कामी बोलाविले असता त्यांना रक्कम रु.१,३०,००,०००/- लक्ष चे दर दिलेत वाटाघाटी अंती दिलेले दर देखील जास्त वाटत असल्याने त्यांना मनपा आयुक्त यांचे कार्यालयात समक्ष वाटाघाटी करीता बोलाविले असता त्यांनी रक्कम रु.१,२५,००,०००/- रकमेत काम करण्यास दिनांक ०७/०२/२०१९ रोजीच्या पत्रान्वये लेखी संमती दिलेली आहे. तरी महात्मा गांधी उदयान तीन वर्षा करीता देखभाल दुरुस्ती कामी विकासक जैन इरिगेशन सिस्टिम लि.जळगांव यांचे वाटाघाटी अंती रक्कम रु. १,२५,००,०००/- चे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) मधील तरतुदीनुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घेवून पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सुनिल वामनराव खडके**

**अनुमोदक :- श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे**

**नगरसचिव:- विषय क्र. २)** जळगांव शहर महानगरपालिकेच्या मटन मार्केट मधिल जुने ओटे धारक यांना पुर्वीच्या मागील बिलात (भाडयात) १०% नैसर्गीक वाढ करुन त्यांना पुनश्च बिले बजावणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिकेच्या मटन मार्केट ओटे भाडयात १० टक्के वाढ करुन सन २०१८-१९ करीता सदर मटन मार्केट मधील मटन विक्री करणे कामी ओटे भाडे तत्वाने १ वर्षा करीता देणे कामी महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३२२(क) ला अधीन राहुन जुने ओटे धारकांनाच नैसर्गिक वाढ करुन लिलाव करणे कामी दि.२५/०५/२०१८, दि.०६/०६/२०१८, दि.०१/०९/२०१८ व दि.२१/०९/२०१८ रोजी चार वेळा जाहिर सुचना प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदर लिलाव सुचनेनुसार कोणत्याही मटन विक्री करणाऱ्या ओटे धारकांनी प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे मागील वर्षी देण्यात आलेल्या ओटे धारकांना यावर्षी मागील बिलात १० टक्के नैसर्गिक भाडेवाढ करुन बिले बजावणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.मयुर चंद्रकांत कापसे**

**अनुमोदक :- श्री.सुनिल वामनराव खडके**

**नगरसचिव:- विषय क्र. ३)** शासन निर्णय क्रमांक.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.१२८/नवि-२० दि.१५ जुलै २०१७ नुसार म.न.पा.सन्मा.सदस्यांना सन २०१९-२०२० यावर्षासाठी एकूण मानधन रुपये ९६,००,०००/- (शहानऊ लक्ष) व मिटींग भत्ता रुपये ९६,०००/-(शहानऊ हजार) मात्र अदा करणे कामी वार्षिक खर्चास मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री. सुनिल खडके :- सर्व विषय मान्य आहेत. जर तुम्हाला कोणत्या विषयावर चर्चा करायची असेल तर तुम्ही बोलु शकता.

श्री.भगत बालाणी :- नगरसेवकांच्या मानधनाचा जे विषय आपण घेतलेले आहे ते अनेक वर्षापासुन मागे मागे होता. खुप तत्कालीन आयुक्त आले पण कोणीही याची दखल घेतली नाही. परंतु आपले मा.आयुक्त टेकाळे साहेब व मुख्यलेखा परिक्षक श्री. संतोष वाहुळे साहेब आणि सर्व उपायुक्त आपण हे चांगला निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल मी आपला सर्वांचा आभार व्यक्त करतो व अभिनंदन करतो.

श्री.नितीन लढढा :- सर्व मा.सदस्यांच्या मानधनाबद्दल आपण जे निर्णय घेतलेले आहे. पण जे माजी नगरसेवक आहे त्यांच्या बद्दल ही काही निर्णय व्हायला पाहिजे ते जुने थकबाकीदार आहे. यांचे नियोजन तुम्ही टप्प्या टप्प्याने करा. ते ही लोकतंत्रने निवडुन आलेले आहे. कामे त्यांनी केलेली आहे. तर त्यांच्या मानधनाचा ही नियोजन आपण करावा ही विनंती आहे.

श्री.नितीन लढढा :- कॉम्पॅक्टरच्या संदर्भात विषय आहे. विषय क्र.०७, एक कॉम्पॅक्टरला खर्च रु.२,७७,६१५/- व दुसऱ्या कॉम्पॅक्टरला रु.९,००,१७०/- खर्च आहेत.दोन्ही कॉम्पॅक्टरसोबत घेण्यात आलेले होते. माहिती घेतल्यानंतर असे कळले की, ज्या कॉम्पॅक्टरला ९ लक्ष रुपये लागत आहे. त्या कॉम्पॅक्टर चा मागचा पत्र्याला क्रॅक झाले होते आणि त्याच्याकडे दुर्लक्ष झाल्याने ते तुटुन पडले , नाही तर या कॉम्पॅक्टरला ही सारखेच रु.२,७७,६१५/- खर्च आले असते. छोटे मोठे असे चुकांमुळे महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होत असते. वाहन विभागाला सक्षम अभियंताच नाही . वाहन विभाग हा खुप मोठा विभाग आहे. जवळपास २०० च्यावर वाहने आपल्याकडे आहे. तर मानधनावर का घेतले जात नाही. परंतु एक ऑटोमोबाईल इंजिनिअरची नियुक्ती आपण करावी.

मा.आयुक्त :- मा. सभापती व सर्व सन्मा.सदस्य नगरपालिका असतांना वाहन विभागाची काय व्यवस्था होती मला सांगावे.

श्री.नितीन लढढा :- त्यावेळेस एक मेकॅनिकल इंजिनिअर होते ते रिटायर झाले, व्ही.आर.एस. घेतली त्यांनी. तद्नंतर अशी पर्यायी व्यवस्था सुरु आहे.

मा.आयुक्त :- जरी आपण कोणीही कॉन्ट्रक्ट बेसीसवर घेतले तर प्रशासकीय नियंत्रण आपल्या कुठल्या तरी अभियंताकडे ठेवावे लागणार.

श्री.नितीन लढढा :- परंतु सक्षम अधिकारी त्या विभागाला पाहिजे, आणि कमीत कमी एक छोटा वर्कशॉप Maintain व्हायला पाहिजे. कारण छोटे छोटे कामासाठी आपली वाहने बाहेर जातात. तर असा व्यक्ती मानधानावर ठेवण्याकरीता प्रशासनाकडुन प्रस्ताव मागविण्यात यावे. विषय क्र.१०, मेलेले जनवारे उचलण्या संदर्भात हे २ कर्मचारींना या सेवेमध्ये कायम करण्याच्या दृष्टीकोनातुन बऱ्याचदा हा प्रस्ताव सभागृहासमोर आलेला आहे. परंतु शासन स्तरावर ते प्रस्ताव तसेच प्रलंबित राहतात. यांना आपण जे मानधन देतो ते खुप कमी आहे, एखाद्या चतुर्थश्रेणी सफाई कामगाराला आपण जे पगार देतो कमीत कमी ते पगार आपण त्यांना द्यायला पाहिजे कारण त्यांच्या तुलनेत हे त्यांच्यापेक्षा जास्त कामे करतात.

श्री.सुनिल खडके :- जर यात अजुन दोन कर्मचारी नियुक्त केले तर आपल्याला हे काम प्रभाग समितीनुसार करता येईल.

मा.आयुक्त :- आपली आर्थिक परिस्थिती सुधरल्यावर विचार करता येईल.

मा.सभापती:- मेलेले जनावरे उचलणारे जे कर्मचारी आहे त्यात अजुन दोन कर्मचारी नियुक्त करण्या संदर्भात आयुक्त साहेब पाठपुरावा करणारच आहे. आणि त्यांना आज जे मानधन भेटत आहे रु.११०००/- त्यात आपण रु.१०००/- वाढवुन ते रु.१२०००/- करण्यात यावे.

श्री.सुनिल खडके :- कमीत कमी रु.१५०००/- करायला पाहिजे.

श्री.नितीन लढ्ढा :- तुम्ही परिस्थिती बघा त्यांची.

मा.आयुक्त :- त्यांची परिस्थिती माझ्या मते फार बिकट नाही.

श्री.नितीन लढ्ढा :- नगरसेवकांचे मानधन दोन महिने उशीरा द्या परंतु या दोन कर्मचाऱ्यांचा विचार व्हावा.

श्री.सुनिल खडके :- दुसरे कोणीही हे काम करायला तयार होत नाही.

श्री.भगत बालाणी :- साहेब आपण चार लोकांचे सांगत आहे पण मला वाटते की चार लोकांचे रु.११०००/- प्रमाणे रु.४४,०००/- होतात. तर यांनाच रु.१५०००/- प्रमाणे द्या म्हणजेच रु.३०,०००/- प्रमाणे आपले रु.१४०००/- वाचतील.

श्री.सुनिल खडके :- किमान वेतन कायद्यानुसार त्यांना पगार द्यावा.

मा.आयुक्त :- बालाणी साहेबांनी जी सुचना मांडली ती बरोबर आहे. आपण दोन कर्मचारी ठेऊ आणि वेतन रु.१४०००/- करु.

श्री.नितीन लढ्ढा :- या नंतर आता सर्व १०० कोटीच्या निधीतले कामे आहेत. यात माझी फक्त एकच सुचना आहे की या राज्य शासनाच्या निधीतले कामांच्या गुणवत्ते वरती या कामांचे निष्कर्श योग्य पध्दतीने Fulfill होत आहे की नाही हे पाहण्याच्या दृष्टीकोनातुन आपण उपायुक्त यांच्या अध्यक्षते खाली दोन तीन अभियंत्याची नियुक्ती करुन एक प्रशासकीय समिती बनवावी. मक्तेदार जे कामे करतात ते आम्हाला ही समाधानकारक नसतात आणि तुम्हालाही समाधानकारक नसतात. केलेल्या कामाची गुणवत्ता इतकी चांगली नसते. आणि लोकं लोकप्रतिनिधींना जाब विचारतात. तर आपल्या कामाचे नियंत्रण योग्य पध्दतीने पाहिजे ही विनंती आहे. आणि त्याची अंमलबजावणी योग्य पध्दतीने करणार अशी अपेक्षा आहे.

श्री.सदाशिव ढेकळे :- आता या ठिकाणी भाऊंनी सांगीतले की इंजिनियर यांची एक कमिटी स्थापन करून काम करावे , आपले जे इंजिनियर आहेत ते जबाबदार नाहीत का जे काही काम झाले असेल आणि तसे काही झाले असेल तर तुम्ही निदर्शनास आणुन द्या ज्या प्रभागात काम व्यवस्थित झाले नसेल किंवा इंजिनियर ने लक्ष दिले नसेल , कमिटी नेमावी समिती नेमावी त्यापेक्षा अशा लोकांवर ॲक्शन घ्या , आपल्याकडे आधीच स्टाफ कमी आहे याआधी आपल्या लक्षात आले नाही का . शासनाकडुन आलेल्या अनुदानाचा १०० कोटी रूपयांचा जो कार्यक्रम आहे त्यावर शासनाचे नियंत्रण आहे .

श्री.नितीन लढ्ढा :- गुणवत्ता जर चांगली असेल तर ते काम समिती बघणार , पैसा शासनाचा असो की महापालिकेचा असो त्याचा योग्य मोबदला आणि योग्य पध्दतीची गुणवत्ता तपासली पाहीजे , समिती नेमल्याने पहाड कोसळेल असे नाही , ज्या दिवशी यावर निर्णय होईल त्या दिवशी समिती बघेल की त्याची गुणवत्ता कशी आहे योग्य पध्दतीने काम केले आहे किंवा नाही . योग्य असेल तर ओके करेल चुकीचे केले असेल तर रिपोर्टींग करेल , प्रशासनाला जी काही ॲक्शन घ्यायची असले ते प्रशासन घेईल. किंवा मंत्रालयाचे मत घेईल. आमचे म्हणणे एकच आहे की कामाची गुणवत्ता ही योग्य पाहीजे बाकी काही नाही .

मा.आयुक्त :- अशा प्रकरणात गुणवत्ते बाबत कोणत्याही परिस्थिती मध्ये तडजोड होता कामा नये आणि ही जबाबदारी संबंधीत इंजिनियरची आहे , त्यानंतर त्यावर सुपरव्हिजन करणारे जबाबदार आहेत आणि बऱ्याच ठिकाणी हा अनुभव येतो की त्यांची गुणवत्ता ही बरोबर नसते . माझी एक सक्त सुचनाआहे की गटारींचे पुर्ण स्लोप झाल्याशिवाय पुढच्या कामांना परवानगी देवु नका , जर असे झाले तर मी स्वत: तेथे जाऊन पाहणी करणार आहेच जर तेथे पाणी नाही आले आणि मध्येच थांबले तर त्याला एकही पैसा मिळणार नाही , आणि जे कोणी सर्टीफाय करतील त्यांचेवर ॲक्शन घेतली जाईल .

श्री.सुनिल खडके :- कांचन नगर परिसरातील तेथील आपले सन्मा .नगरसेवक श्री. किशोर बाविस्कर आहेत त्यांनी आपल्याकडे पाईप लाईनची मागणी केलेली होती , बहिणाबाई नगर परिसरात ४५ घरे आहेत त्या ठिकाणी परंतु महापालिकेकडुन त्या ठिकाणी पाईपलाईनची पुर्तता करण्यात आलेली नाही त्या परिसरातील नागरीकांनी स्वत: पाईप विकत आणुन पाईप लाईन टाकत आहेत परंतु त्यांची मागणी आपल्याकडे एवढीच आहे की आपण आपले जेसीबी द्यावे त्यानुसार आम्ही ती पाईपलाईन टाकुन घेवु त्यांनी दि.२९/१०/२०१८ व १०/०५/२०१९ , ०३/०६/२०१९ आणि ११/०६/२०१९ आणि आज १७/०६/२०१९ पावेतो लेखी तक्रारी दिलेल्या आहेत.

मा.आयुक्त :- आपल्याकडे जो पाण्याचा साठा आहे जर आपली परिस्थिती सुधारली की आपण त्यांना जेसीबी देवु .आपण ही आपली लेव्हल पाहुन आपण काम करून टाकु .

श्री.सुनिल खडके :- त्यांनी हंडा मोर्चा सुध्दा आणला होता .

मा.आयुक्त :- आपण अशा क्रीटीकल परिस्थिती मध्ये कुठलीच जोडणी देत नाहीत .पाण्याची व्यवस्था सुरळीत झाली की आपण देवु .

श्री.नितीन लढ्ढा :- नॅशनल हायवे पासुन तर कब्रस्थान पर्यंत नाला आहे , नाल्याची रुंदी ही खुप मोठी आहे , माझ्या घराचा जो ले आऊट होता त्या लेआऊट आम्ही मंजुर करून त्यातील प्लॉट विक्री केले , त्याठिकाणी नागरी वस्त्या वाढल्या असुन तसेच अतिक्रमण वाढली आहेत त्यामुळे त्या नाल्याची रुंदी कमी झाली आहे , त्या नाल्याचे काम जवळपास ९२ लक्ष ७० हजार रूपयांचे काम आहे कामाचे काही नाही फक्त नाल्याचे डिमायग्रेशन हे अत्यंत योग्य पध्दतीने व्हायला पाहीजे की संपुर्ण नाल्याची रुंदी ही योग्य पध्दतीने मार्कींग करून आपण जर असे केले नाही तर अतिक्रमण अजुन वाढुन नाल्यांची रुंदी कमी होईल त्यामुळे नाल्याचे पाणी थांबुन ते पाणी नागरी वस्त्यांमध्ये शिरण्याचे प्रकार वाढतात तर या कामासाठी ज्या गोष्टी असतील त्या आवश्यक पणे तपासुन करायला पाहीजे , जर असे काही केले नाही तर त्याचा फटका हा मेहरूण वासीयांना बसतो त्याबाबतीत स्पष्ट निर्देश प्रशासनाने द्यावे .

श्री.सुनिल खडके :- बहिणाबाई नगर परिसरात पाणी नसल्यामुळे तेथील नागरीक बाहेरून पाणी आणुन पाणी पित आहे , तरी त्या परिसरात पाण्याच्या टँकरची व्यवस्था झाली तर बर होईल.

श्री.नितीन बरडे :- साहेब आपण नालेसफाई करण्याचे कामे केली आहे , आमच्या भागातील विवेकांनद नगर आहे त्या भागात खाजगी प्लॉट मधुन नाला गेलेला आहे , तसेच दोन्ही बाजुला घरे बांधली गेलेली आहेत तसेच त्या नाल्याची भिंत पडलेली आहे त्या मुळे त्याचे बॅकवॉटर हे समता नगर पर्यंत येते हे प्रकरण आरोग्य विभागाकडुन नगररचना विभागाकडे पाठविलेले आहे.

श्री.भास्कर भोळे :- सदर प्रकरण नगररचना विभागाने बांधकाम परवानगी दिलेली असुन त्याकरीता सदर प्रकरण पाठविलेले आहे .

मा.आयुक्त :- आता जर हा विषय आला नसता जर समजा हा विषय ६ महिन्यानी आला असता तर तुम्ही मला तेवढे सांगीतले असते का अशा पध्दतीने करू नका ज्या पध्दतीने आहे त्या पध्दतीने करा.

श्री.नितीन बरडे :- साहेब यापुर्वी ही त्याठिकाणी नाल्यांच्या पाण्यामुळे २ मुले वाहुन गेल्याने त्यांचा मृत्यु झालेला आहे , निव्वळ नाला ब्लॉक झाल्यामुळे असे होत आहे . तसेच अपार्टमेंट ला नळ संयोजन कसे द्यायचे म्हणजे प्रत्येकला वैयक्तीक द्यायचे किंवा संपुर्ण अपार्टमेंटला एकच संयोजन दयावे .

मा.आयुक्त :- यावर संपुर्ण विचार करून लवकरच निर्णय घेवु.

श्री.विष्णु भंगाळे :- सभापती महोदय व मा.आयुक्त साहेब मागील मिटींग मध्ये सुध्दा मी बोललो होतो माझ्या प्रभागातील आर.आर शाळा , बी.जे मार्केट हया परिसरात कचरा हा मोठया प्रमाणात पडलेला असतो , एक महिना झाला पिकअप व्हॅन गॅरेजमध्ये आहे ती आज सुध्दा आलेली नाही तसेच रोटर सुध्दा बंद पडलेले आहे म्हणजे जे काही जे काम जलदगतीने होत होते ते १० ते १५ दिवसांपासुन बंद आहे याचा खुलासा करावा तसेच सिलेंडर फुटणे याला कारण काय आहे तरी पिकअप व्हॅन किती दिवस बंद राहील १ महिन्यापासुन ती बंद आहे .

मा.आयुक्त :- भोळे खुलासा द्यावा.

श्री.सुनिल पंडीत भोळे :- लिवरही त्याचे नादुरूस्त होते परंतु लोढर जे आहे आपण दुरूस्ती साठी नाशिक येथे पाठविलेले आहे त्यांनी मागणी वरची दिलेली होती व त्यामुळे ते लोडर बंद आहे .

मा.आयुक्त :- किती दिवसात होणार ते सांगा .

श्री.सुनिल पंडीत भोळे :-साधारण ८ ते १० दिवसांत येईल साहेब .

मा.आयुक्त :- ते आले की तात्काळ पुर्ण करून द्यायची जबाबदारी तुमची आहे.

श्री.विष्णु भंगाळे :- १ महिन्यापासुन बंद आहे तरी याकडे आपण लक्ष द्यावे ही विनंती आहे .तसेच जळगांव शहरातील हातपंप नादुरूस्त झाले ले आहेत जसे भिलपुरा मस्जीद जवळील हातपंप आहे व डॉ.डाबी यांच्या हॉस्पीटल शेजारी एक पंप आहे त्याला पाणी सुध्दा आहे पण तो नादुरूस्त आहे .तरी या गोष्टीकडे आपण लक्ष द्यावे ही विनंती आहे .आपण ते हातपंप दुरूस्ती करणे बाबत सुचना करून द्याव्यात .तसेच मार्केट जवळील जी कचऱ्यांची परिस्थिती आहे ती आजही आहे. आपल्या विभागाकडुन चोकअप निघत नाही , बाकीचे कामे काय करणार आपण .

श्री.विकास पाटील :- एस.टी .वर्कशॉप च्या मागील भिंत आणि जो पाईप गेलेला आहे त्या ठिकाणी दररोज साफसफाई होत असते परंतू त्या चोकअप झालेला पाईप बदलविणे हा एकच पर्याय आहे . आणि मी भाऊंनाही सांगीतले होते की पाईप बदलवावा लागेल .

श्री.विष्णु भंगाळे :- नगरसेवक जर आपल्या कडे त्यांच्या समस्या मांडत असेल तर त्या चे निराकरण करायचे काम आपले आहे .

मा.सभापती :- आता नितीन भाऊंनी मला लिहुन दिले होते आणि तुमच्या कामासंदर्भात माझी चर्चाही झाली होती तसेच पाईपाविषयी भोळे साहेबांशीही बोलणे झालेले होते या काही अडचणी तुन मार्ग काढायचे आहेत .

श्री.विष्णु भंगाळे :- काही भागात टॉयलेटचे पाणी रिटर्न जाते आहे .तरी आपण समस्या आपण स्विकारली नाही तर करायचे काय .

श्री.नितीन बरडे :- मागील सभेमध्ये आम्ही काही किरकोळ समस्या मांडल्या होत्या तुम्ही सांगीतले होते की सदर समस्यांचे निराकरण पुढील सभेपावेतो व्हायला पाहीजे त्यातील एकही काम झालेले नाही .

श्री.विष्णु भंगाळे :- शाहु नगर मधील गटारीचे काम सुरू आहे त्याचा आपण स्पीड वाढवा तेथील रहिवाश्यांना व वापरणाऱ्या सर्वांना किती दिवसांपासुन त्रास सहन करावा लागत आहे . आम्हाला तेथील नागरीक खुप बोलतात .

श्री.नितीन लढढा :- त्यांनी व्हाटसअप वर फोटो टाकलेले आहेत आपण स्वत: व्हिजीट करून तेथील रस्त्याची परिस्थिती बघा झाले काय आहे की शिवाजी नगरचा उडडान पुल बंद झाल्यानंतर संपुर्ण वाहतुक जी आहे ती बंजरंग बोगदा व भोईटे नगर कडुन वळविण्यात आलेली आहे त्या रस्त्याची निवीदा मनपा निवडणूकी पुर्वी झालेली होती कार्यादेश मक्तेदाराला दिला गेला होता मक्तेदाराने डब्लुबीएम चे काम पुर्ण केले अस्पायरीटीचे काम सोडुन दिले आहे त्या रस्त्याची परिस्थिती फार वाईट आहे सदर भाग दाट वस्तीचा भाग आहे लहान लहान मुले रस्त्यावर पळत असतात त्या रस्त्यावर फार मोठया प्रमाणात वाहतुक होत असते आपण फक्त ५ मिनीटे तेथे व्हिजीट करा आपणांस त्याचे गांभीर्य लक्षात येईल . काम आता सुरू आहे मध्यंतरी निवडणुकीच्या काळात काम बंद होते अशी कामे दिवस रात्र करून तातडीने पुर्ण केली पाहीजे .

मा.आयुक्त :- असे निदर्शनास येत आहे , ठराविक लोकांच्या नावे बरेच कामे त्यांच्या नावावर आहेत कोणाकडे कीती व कोणती कामे आहे त्याची स्वतंत्र माहिती मला द्या आणि त्या लोकांना ही येथे बोलावुन घ्या .

श्री.विष्णु भंगाळे :- शिवाजी नगरचा पुल आता पाडण्यात आलेला आहे तसेच नविन बोगदा आता जो तयार झालेला आहे त्यामुळे त्या भागातुन वाहतुक खुप वाढलेली आहे तर त्याकरीता आपल्या माध्यमातुन जर रोडाच्या बाजुची जी लेव्हल आहे तर खुप मोठया प्रमाणात साईड पटयाचेही उंच भाग झाल्यामुळे तसेच त्या ठिकाणी झाडे झुडपे वाढलेली आहे ते जर आपण काढुन टाकले तर ती रहदारी गेटवर अंवलंबुन न रहाता लोक बोगद्याखालुन जातील .

मा.आयुक्त :- या सुचना ज्या येत आहेत सदस्यांकडुन याबाबत वरिष्ठाकडुन यायला पाहीजे असे अपेक्षित नाही आपल्या इंजिनियर ला एवढे जर कळत नसेल , आपल्याला उपलब्ध याच्यातुनच करायचे आहे तर ते पाहुन लवकर करा .

श्री.सदाशिव ढेकळे :- माझ्या प्रभागात भगवान नगर आहे त्या ठिकाणी कुठलीही गटर वगैरे नाही तसेच काही ठिकाणी चाऱ्या केलेल्या आहेत व पाईप टाकलेले नाही चाऱ्यामध्ये त्याकरीता पावसाळयापुर्वी जर काही होत असेल कारण त्या परिसरातील नागरीकांचे प्रचंड हाल होतील पाईप जर दिले तर बरे होईल . तसेच त्या भागात चाऱ्या करण्याची सुध्दा व्यवस्था करावी .

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१५/प्र.क्र.१२८ नवि-२० दि.१५ जुलै २०१७ चे शासन निर्णयात नमुद केले प्रमाणे सन्मा. मनपा सदस्य यांना दरमहा रु.१०,०००/- मात्र मानधन अदा करणेत येत आहे त्यास महासभा ठराव क्र.७४७ दि.२६/०९/२०१७ अन्वये मान्यता प्रदान करण्यात येवुन ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

जळगांव शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक ऑगस्ट २०१८ मध्ये पार पडलेली असुन जळगांव शहरातील एकुण ७५ जागेवर निवडणुक घेण्यात आलेली आहे. त्यानुसार ७५ सन्मा.सदस्य निवडुन आलेले आहेत व ५ सदस्य यांची स्विकृत सदस्य पदी निवड करण्यात आलेली आहे. मनपा सभागृहात एकुण सदस्य संख्या ८० (ऐंशी) आहे त्या करीता प्रती सदस्य यांची दरमहा मानधनाची रक्कम रु.१०,०००/- (दहा हजार) प्रमाणे एकूण रक्कम रुपये ८,००,०००/- (आठ लक्ष) मात्र होत आहे. तरी माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२० पावेतो सन्मा.सदस्यांची मानधनाची वार्षिक रक्कम रु.९६,००,०००/- (शहानंऊ लक्ष) सरासरी होत असुन सदरची रक्कम त्यांना अदा करावी लागेल.

तसेच सभागृहात एका सभेसाठी उपस्थित असलेल्या सन्मा. मनपा सदस्य यांना मिटींग भत्ता रु.१००/- (शंभर मात्र) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अ (१) चे तरतुदीनुसार देय्य आहे. दरमहा १ महासभा याप्रमाणे एक महिन्यासाठी सर्व सन्मा.सदस्यांना सरासरी एकूण रक्कम रु.८०००/- याप्रमाणे एका वर्षात १२ महासभा झाल्यास माहे एप्रिल २०१९ ते मार्च २०२० करीता सरासरी रु.९६०००/- (शहानऊ हजार) मात्र सन्मा.सदस्यांना मिटींग भत्ता अदा करावा लागेल.

प्रशासनाने प्रस्तावित केलेप्रमाणे सन २०१९-२०२० यावर्षात म.न.पा.सन्मा.सदस्यांना एकूण रक्कम रु. ९६,००,०००/- मात्र एकूण मानधन व मिटींग भत्ता ९६,०००/- मात्र अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सौ.उज्वला मोहन बेंडाळे**
**अनुमोदक :- श्री.मयुर चंद्रकांत कापसे**

**नगरसचिव:- विषय क्र. ४)** सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी तक्त्यात नमुद अधिकृत विक्रेते यांच्याकडून जळगांव शहर महानगरपालिकेच्या वाहनांसाठी नविन साहित्य, देखभाल दुरुस्ती, टायर टयुब, इंधन (ऑईल) इ.खरेदी करणे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२)(२) नूसार भावपत्रक न मागवता खरेदी करणे तसेच देखभाल दुरुस्ती करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,जळगांव शहर महानगरपालिका हद्दीतील तक्त्यात नमुद तसेच तमाम अधिकृत विक्रेत्यांकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार भावपत्रक न मागविता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी जळगांव शहर महानगरपालिकेच्या मालकीची विविध प्रकारचे वाहनांसाठी वेळोवेळी सुटेभाग, देखभाल दुरुस्ती, टायर टयुब फलॅप, बॅटरी, इंधन, विविध प्रकारचे ऑईल इत्यादी खरेदी करण्याकामी, देखभाल दुरुस्ती काम करुन घेता येतील.

| अ.क्र. | अधिकृत विक्रेतेचे नांव व पत्ता | कामाचा तपशिल |
|---|---|---|
| १ | मे.उज्वल ऑटो मोटीव्ह प्रा.लि.जळगांव | टाटा कंपनीच्या सर्व वाहनाचे अधिकृत विक्रेता असल्याने टाटा कंपनीच्या सर्व वाहनाची रिपेअरी व सर्व स्पेअर पार्टस विक्रेता |
| २ | मे.मोरया ट्रेडिंग कंपनी प्रा.लि.जळगांव. | सर्व प्रकारचे ऑईल, ग्रिस व इतर वंगण विक्रीसाठी कंपनीचे अधिकृत विक्रेता. |
| ३ | मे.सुयान ट्रेडिंग कंपनी प्रा.लि.जळगांव | जे.सी.बी.अधिकृत विक्रेता व जे.सी.बी.रिपेअरी व सर्व |

| | | |
|---|---|---|
| | | स्पेअर पार्टस विक्रेता |
| ४ | मे.जे.के.टेम्पो जळगांव. | फोर्स कंपनीचे अधिकृत विक्रेता व फोर्स कंपनीच्या वाहनाचे रिपेअरी व स्पेअर पार्टस विक्रेता. |
| ५ | मे.मानराज मोटर्स प्रा.लि.जळगांव | मारुती सुझुकी इंडिया लि.चे अधिकृत विक्रेता व रिपेअरी, स्पेअर पार्टस विक्रेता. |
| ६ | मे.बच्छाव मोटर्स, नशिराबाद ता. जि. जळगांव | अशोक लेलँड कंपनीच्या सर्व वाहनाची रिपेअरी व सर्व स्पेअर पार्टस विक्रेता. |
| ७ | सातपुडा ऑटो मोबाईल्स, नशिराबाद ता.जि.जळगांव | महिंद्रा & महिंद्रा कंपनीचे बोलेरो या वाहनाचे अधिकृत विक्रेता असल्याने रिपेअरी व सर्व स्पेअर पार्टस विक्रेता. |
| ८ | पाटनकर ब्रदर्स जळगांव. | जेटींग मशिन या वाहनाचे पंप व इतर स्पेअर पार्टस विक्रेता. |
| ९ | सिध्दी ऑटो मोबाईल्स ट्रॅक्टर & सेल्स सर्व्हिस जळगांव. | महिंद्रा & महिंद्रा कंपनीचे ट्रॅक्टर व फ्रंट एन्ड लोडरचे सर्व स्पेअर पार्टस विक्रेता व रिपेअरी इ. |
| १० | गौरव टायर्स जळगांव. | टायर टयुब व फलॅपसाठी अधिकृत विक्रेता. |
| ११ | बाफणा टायर्स जळगांव. | टायर टयुब व फलॅपसाठी अधिकृत विक्रेता. |
| १२ | श्री स्वामी बॅटरी सेंटर जळगांव. | एक्साईड बॅटरीसाठी अधिकृत विक्रेता. |
| १३ | मे.सुरेश ऑटो इलेक्ट्रिकल्स प्रा.लि.जळगांव. | एक्साईड बॅटरीसाठी अधिकृत विक्रेता. |

सदर अधिकृत विक्रेते यांनी आर्थिक वर्ष २०१९-२० चे अधिकृत डिलर, विक्रेता असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे तसेच संबंधीतांकडून रक्कम रु.१,०००/- मात्रच्या मुद्रांक शुल्क पेपरवर करारनामा करुन देणे आवश्यक आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता तात्काळ वाहनांची देखभाल दुरुस्ती करणे व साहित्य खरेदी करणे गरजेचे असल्याने वेळोवेळी कामाची निकड लक्षात घेता जळगांव शहरातील तमाम अधिकृत विक्रेते / उत्पादक यांचेकडुन डिलेव्हरी अगेंन्स्ट पेमेंट या तत्वावर काम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

तरी उपरोक्त तक्त्यात नमुद व जळगांव शहर हद्दीतील तमाम अधिकृत विक्रेत्याकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार भावपत्रक न मागविता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी जळगांव शहर महानगरपालिकेच्या वाहनांसाठी वेळोवेळी लागणारे टायर टयुब फलॅप, बॅटरी, इंधन, विविध प्रकारचे ऑईल, स्पेअर पार्टस, देखभाल दुरुस्ती इत्यादी कंपनीच्या अधिकृत दरानुसार खरेदी करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सुनिल वामनराव खडके**

**अनुमोदक :- श्री.सुरेश माणिक सोनवणे**

**नगरसचिव:- विषय क्र. ५)** महानगरपालिका मालकीच्या विविध प्रकारच्या वाहनांकरिता सन २०१९-२० या आर्थिक वर्षासाठी आय.ओ.सी.लि.पानेवाडी, मनमाड यांचेकडून २७ डिझेल टँकर (इंधन) खरेदी करणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,जळगांव शहर महानगरपालिकेकडील आरोग्य, अग्निशमन, दवाखाने, पाणी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, मलेरिया, अतिक्रमण, विदयुत, प्रशासकीय विभागाकडील कार्यरत वाहनांकरिता वेळोवेळी इंधन (डिझेलची) आवश्यकता असते त्याकरिता वाहनांसाठी डिझेल खरेदी करणे आवश्यक आहे. डिझेल खरेदी करणे कामी सन २०१९-२० मध्ये इंधन (डिझेल) खरेदी या शिर्षाखाली स्वतंत्र बजेट तरतुद रक्कम रु.३ कोटी ३० लक्ष मात्रची करण्यात आलेली आहे. डिझेल वाटप करणेकामी महानगरपालिका स्वयंचलीत डिझेल पंपाची उभारणी आर.एल.चौफुली, एम.आय.डी.सी. फायर स्टेशन जळगांव येथे करणेत आलेली असुन त्या

ठिकाणावरुन विविध विभागाकडील कार्यरत असलेल्या वाहनांवरील कार्यरत असलेले वाहन चालक व संबंधीत प्राधिकृत अधिकारी यांचे मागणी निहाय डिझेल वाटप करण्यात येते. महानगरपालिका डिझेल खरेदी ही शासकीय दरामध्ये आय.ओ.सी.कंपनी पानेवाडी,मनमाड येथून करणेत येते. डिझेल खरेदीची किंमतीमध्ये वेळोवेळी चढ-उतार (परिवर्तन) होत असतात.

सन २०१९-२० या आर्थीक वर्षात जळगांव महानगरपालिकेकडील डिझेल पंपाकरिता अंदाजीत २७ डिझेल टँकर (इंधन) ची आवश्यकता आहे. तरी सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरिता एकुण अंदाजीत २७ डिझेल टँकर (इंधन) खरेदी करणे कामी वेळोवेळी येणाऱ्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे**

**अनुमोदक :- श्री.मयुर चंद्रकांत कापसे**

**नगरसचिव:- विषय क्र. ६)** मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ एम ४३० (टाटा इंडिगो) या वाहनाची दुरुस्ती करणेबाबत तसेच वित्तीय मर्यादेपेक्षा रक्कम रु.१७,२७७/- मात्रचे जास्तीच्या खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की, मनपा दवाखाने विभागाकडील वाहन क्रं.एम.एच.१९ एम ४३० (टाटा इंडिगो) हे वाहन प्रशासकीय कामकाजाकरिता प्रमुख वैदयकीय अधिकारी यांचे अधिपत्याखाली कार्यरत आहे. वाहनाची खालीलप्रमाणे दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे.

| मनपा वाहन क्रं.एम.एच.१९ एम ४३० (टाटा इंडिगो), (उत्पादीत वर्ष जानेवारी -२००९) | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | वाहनातील दुरुस्तीचे कामे | | |
| १ | फ्रंट शॉकअप व रिअर शॉकअप नविन-४ नग | १० | डोअर सेंटर लॉक दुरुस्त करणे |
| २ | बॉल जॉईन्ट नविन टाकणे | ११ | व्हील अलायमेंट बॅलेसींग करणे |
| ३ | बुशींग कीट फ्रंट रिअर नविन टाकणे | १२ | वाशिंग ग्रिसींग करणे |
| ४ | सस्पेंशन बुशींग कीट पार्टसह | १३ | जनरल चेकअप बदली करणे |
| ५ | फिल्टर बॉडी, हेड लाईट सिल बिम-२ नग | १४ | ऑईल बदली करणे |
| ६ | नमुद कामे पार्टसह मजुरीसह करणे आवश्यक आहे. | १५ | F.I. सर्व्हिसींग करणे |
| ७ | ऑईल फिल्टर,डिझेल फिल्टर,एअर फिल्टर बदली करणे | १६ | मड कव्हर बदली करणे |
| ८ | कुलंट वॉटर बदली करणे | १७ | सिट कव्हर बदली करणे |
| ९ | किलोमिटर, डिझेल मिटर दुरुस्ती करणे | १८ | वाहन इंटरनल क्लिनअप करणे |

वरील प्रमाणे दुरुस्तीची कामे करणे कामी जळगांव शहरातील तमाम अधिकृत विक्रेते / उत्पादकांकडून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५ (२) (२) नुसार भावपत्रक न मागविता सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी जळगांव महानगरपालिकेच्या मालकीच्या वाहनांसाठी वेळोवेळी सुटेभाग, वेळोवेळी देखभाल दुरुस्ती, कामाची निकड लक्षात घेता जळगांव शहरातील तमाम अधिकृत विक्रेते / उत्पादक यांचेकडून डिलेव्हरी अगेस्ट पेमेंट या तत्वावर काम करण्यास स्थायी समिती ठराव क्र.८४६ दि.१४/०२/२०१८ नुसार मान्यता प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार अधिकृत विक्रेते मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांच्याकडील इस्टिमेट दि.०८/०२/२०१९ अन्वये सदर वाहनाचे दुरुस्ती व स्पेअर पार्टस खरेदी करणे कामी रक्कम रु.७३,४६७/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२ मंत्रालय मुंबई दि.१७ एप्रिल २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका- १९७८ भाग-पहिला, उप विभाग एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारान्वये डिझेलवर चालणाऱ्या प्रत्येक वाहनासाठी प्रति वर्ष ६०,०००/- मात्र वित्तीय मर्यादा निर्धारित केलेली आहे. मात्र सदर वाहनावर आर्थिक वर्ष २०१८-१९ प्रमाणे हिष्ट्रीबुक नुसार दि.०६/०३/२०१९ पावेतो रक्कम रु.३,८१०/- मात्र एवढा खर्च झालेला आहे. सदर वाहनावर प्रस्तावित खर्च रक्कम

रु.७३,४६७/- मात्र अपेक्षित आहे. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षामध्ये रक्कम रु.७७,२७७/- मात्र एवढा खर्च अंदाजीत होणार आहे. तरी वित्तीय मर्यादेपेक्षा वाढीव रक्कम रु.१७,२७७/- मात्रला तसेच मे.उज्वल ऑटोमोटीव्ह प्रा.लि.जळगांव यांना कार्यादेश निर्गमित करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे**

**अनुमोदक :- श्री.मयुर चंद्रकांत कापसे**

**नगरसचिव:- विषय क्र. ७)** म.न.पा.वाहन क्र.एम एच १९ एम ९११८ (कॉम्पॅक्टर) या वाहनाची दुरुस्ती अधिकृत उत्पादक व विक्रेते मे.KAM-AVIDA, ENVIRO ENGINEERS PVT.LTD PUNE यांचेकडून सन २०१९-२० चे अंदाजपत्रकीय तरतुदीतुन करणेस व त्याकामी येणारा अंदाजीत रक्कम रु.९,०१,८०९/- मात्रचे खर्चास महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ (२)(२) नुसार खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, म.न.पा. आरोग्य विभागाकडील वाहन क्र. एम एच 19 एम 9118 (कॉम्पॅक्टर) हे वाहन नागरीकांच्या मुलभुत सुविधेकरीता अत्यावश्यक सेवेतील आहे. त्यामुळे सदर वाहनाचे खालीलप्रमाणे मेजर दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे.

| **म.न.पा. वाहन क्र. एम एच 19 एम 9118 (कॉम्पॅक्टर), (उत्पादीत वर्ष ऑगस्ट-2008)** | |
|---|---|
| **अ.क्र.** | **वाहनातील दुरुस्तीचे कामे** |
| 1 | Tialgate Fabrication Bare Assembly (Rect) 11 TO 18 -1 nos |
| 2 | Scrapper Plate Assy, Bare Fabricated, Kampac Rel 14 TO 18 -1 nos |
| 3 | Guide Block Assy, Kampac Rel 14 TO 18 -2 nos |
| 4 | Wear Plate (Top & Bottom For Male Slide -4 nos |
| 5 | String Wear Plate (Side) For Male Slide Assembly -2 nos |
| 6 | Pin, Tailgate, Male Slide, Hyd, CYL. -2 nos |
| 7 | Pin, Joining Female Slide, & ITS Cylinder ROD END -2 nos |
| 8 | Plate, Locking, Pin, Female Slide, Scraper Plate -2 nos |
| 9 | Hex Bolt (H.T) M 12 X 20 MM Long -2 nos |
| 10 | Pin, Female Slide & Scraper Plate HYD.CYL -2 nos |
| 11 | String Wear Plate –Top for Ejector Block -2 nos |
| 12 | String Wear Plate – Bottom for Ejector Block -2 nos |
| 13 | String Wear Plate-Middle Vertical (For Lh Side) -1 nos |
| 14 | String Wear Plate-Middle Vertical (For RH Side) -1 nos |
| 15 | Filter Element, For Return Line, Model –HFE-10-025, Suitable For Filter Model – HFR 10 -06B –P25 -01 NOS |
| 16 | Seal kit, P.T.O. Side Assy, Gearbox –AL, S6-36/2, Gear / Axial Piston Pump Hyd. 23 To 40 LPM, Directly Mounted -1 nos |
| 17 | Sheet, M.S. Hot Rolled, 3 MM THK (1550 MM Width) -2 nos |
| 18 | Oil, Hydraulic, Grade-68 (Make H.P. Shell, Servo, Castrol, IPOL, Gandhar, Divyol, Chemtrols), (Inventory Code)-180 LTR |
| 19 | Clamp P.V.C. 16 MM I.D For Hydraulic Pipe -12 nos |
| 20 | Clamp P.V.C. 20 MM I.D. For Hydraulic Pipe -12 nos |
| 21 | Ruber Packing Between Body & Tailgate 38X37-4000 Long AS PER DRG 52. RCTG 1010 -1 nos |
| 22 | Pin, EN 24, Hinge, Body & Tailgate, -2 nos |
| 23 | Bush Top for Body & Tailgate Hinge (WT=0.781 KG) -2 nos |
| 24 | Stopper Plate (WT=6.781 KG) -2 NOS |
| 25 | Roller for Stopper -2 nos |
| 26 | Roller Stopper Assembly -2 nos |
| 27 | Roller for Guide Hinge -2 nos |
| 28 | Support Disc -2 nos |
| 29 | Bolt, Roller -2 nos |

| | |
|---|---|
| 30 | Seal Kit, Cylinder HYD, Bin Lifter, Rel 11-18, Single Stage, Double Acting -2 nos |
| 31 | Lever M10 (Both Sides), Length 240 -6 nos |
| 32 | Mud Flap, W-22.8", H-19.5", 16 TO 25 TON GVW For Comactor -4 nos |
| 33 | Tray Bin Lifter -1 nos |
| 34 | Spring For Lifting ARM -2 nos |
| 35 | Angle, Universal -1 nos |
| 36 | Allen CSK Screw M 10X30 MM.LG -100 nos |
| 37 | Allen CSK SCREW M 8X25 -30 nos |
| 38 | Allen CSK Screw M 10 X 40 MM. LG. -40 nos |
| 39 | Repair & Servicing Charges -10 JOB |
| 40 | TATA 2516 Make Cabine (Incueding Penting) -1 nos |

म.न.पा. आरोग्य विभागाकडील वाहन क्रं. एम एच 19 एम 9118 (कॉम्पॅक्टर) हे वाहन शहरातील कचरा संकलन करुन वाहतुक करणे कामी अत्यावश्यक सेवेत कार्यरत असल्याने सदर वाहनाची दुरुस्ती करणेसाठी अधिकृत कॉम्पॅक्टर मॅनीफॅक्चरर असलेले मे. KAM-AVIDA, ENVIRO ENGINEERS PVT.LTD PUNE यांचेकडील कोटेशन नं.3181900579, दि.18/02/2019 अन्वये मेजर दुरुस्ती कामी खर्च रक्कम रु.9,01,809/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर दर हे बाजारभावाशी सुसंगत असुन वाजवी आहेत. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक.विअप्र-1008/प्र.क्र.70/2008/विनिमय, दि.15 मे 2009 चे परिशिष्ठ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, 1978 भाग पहिला उप-विभाग - दोन महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र:विअप्र-2013/प्र.क्र.30/2013/विनिमय, भाग-2 दि.17 एप्रिल 2015 अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला, उप विभाग-एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार डिझेलवर चालणा-या प्रत्येक वाहनासाठी प्रति वर्षी रु.60,000/- पर्यंत मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्राप्त झालेले कोटेशन नं.3181900579, दि.18/02/2019 अन्वये मेजर दुरुस्ती कामी खर्च रक्कम रु.9,01,809/- मात्रला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच वित्तीय मर्यादेपेक्षा खर्च जास्त प्रमाणात होणार असल्याने वाढीव खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 (2) (2) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे**

**अनुमोदक :- श्री.मयुर चंद्रकांत कापसे**

**नगरसचिव:- विषय क्र. ८)** म.न.पा.वाहन क्र.एम एच १९ एम ९११९ (कॉम्पॅक्टर) या वाहनाची दुरुस्ती अधिकृत विक्रेते मे.KAM-AVIDA, ENVIRO ENGINEERS PVT.LTD PUNE यांचेकडून सन २०१९-२० चे अंदाजपत्रकीय तरतुदीतुन करणेस व त्याकामी येणारा अंदाजीत रक्कम रु.२,७७,६१५/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे कामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, म.न.पा. आरोग्य विभागाकडील वाहन क्र. एम एच 19 एम 9119 (कॉम्पॅक्टर) हे वाहन नागरीकांच्या मुलभुत सुविधेकरीता अत्यावश्यक सेवेतील आहे. सदर वाहनाचे खालीलप्रमाणे मेजर दुरुस्तीची कामे करणे आवश्यक व गरजेचे आहे.

| **मनपा वाहन क्र. एम एच 19 एम 9119 (कॉम्पॅक्टर), (उत्पादीत वर्ष ऑगस्ट-2008)** | |
|---|---|
| **अ.क्र.** | वाहनातील दुरुस्तीचे काम |
| 1 | Wear Plate (Top & Bottom For Male Slide -6 nos |
| 2 | String Wear Plate (Side) For Male Slide Assembly -6 nos |
| 3 | Guide Block Assy, Kampac Rel 14 TO 18 -2 nos |
| 4 | PB Bush For Scraper Plate AT Female END Joint -2 nos |
| 5 | Sheet, M.S. Hot Rolled, 3 MM THK. (1550 mm Width) -2 nos |
| 6 | Seal Kit, Cylinder HYD, Bin Lifter Rel, 11-18, Single Stage, Double Acting -2 nos |
| 7 | U Bolt Chassis Securing M 18 X 26" Long -2 nos |
| 8 | Spacer Aluminium U Shaped For Chassis (Gattu) -2 nos |
| 9 | Filter Element, For Return Line, Model-HFE-10-025, Suitable For Filter Model –HFR 10 - 06B-P25 (Without Aluminium Body) -1 nos |

| | |
|---|---|
| 10 | String Wear Plate- Top For Ijector Block -2 nos |
| 11 | String Wear Plate –Bottom For Ijector Block -2 nos |
| 12 | String Wear Plate-Middle Vertical (For LH Side) -1 nos |
| 13 | String Wear Plate-Middle Vertical (For RH Side) -1 nos |
| 14 | Mud Flap, W-22.8”, H-19.5, 16 TO 25 Ton GVW For Compactor -4 nos |
| 15 | Repaing & Servicing Charges -7 nos |
| 16 | TATA 2516 Make Cabine (Incueding Penting) -1 nos |

म.न.पा. आरोग्य विभागाकडील क्र. एम एच 19 एम 9119 (कॉम्पॅक्टर) हे वाहन शहरातील कचरा संकलन करुन वाहतुक करणे कामी अत्यावश्यक सेवेत कार्यरत आहे. असल्याने सदर वाहनाची दुरुस्ती करणेसाठी अधिकृत कॉम्पॅक्टर मॅनीफॅक्चरर असलेले मे.KAM-AVIDA, ENVIRO ENGINEERS PVT.LTD PUNE यांचेकडील कोटेशन नं.3181900581, दि.18/02/2019 अन्वये मेजर दुरुस्ती कामी खर्च रक्कम रु.2,77,615/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सदर दर हे बाजारभावाशी सुसंगत असुन वाजवी आहेत. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक.विअप्र-1008/प्र.क्र.70/2008/विनिमय, दि.15 मे 2009 चे परिशिष्ठ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, 1978 भाग पहिला उप-विभाग - दोन महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम 1965 अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार, महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र:विअप्र-2013/प्र.क्र.30/2013/विनिमय, भाग-2 दि.17 एप्रिल 2015 अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका 1978 भाग पहिला, उप विभाग-एक ते पाच प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार डिझेलवर चालणा-या प्रत्येक वाहनासाठी प्रति वर्षी रु.60,000/- पर्यंत मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. प्राप्त झालेले कोटेशन नं.3181900579, दि.18/02/2019 अन्वये मेजर दुरुस्ती कामी खर्च रक्कम रु.2,77,615/- मात्रला प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे तसेच वित्तीय मर्यादेपेक्षा खर्च जास्त प्रमाणात होणार असल्याने वाढीव खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 5 (2) (2) अन्वये मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे**

**अनुमोदक :- श्री.मयुर चंद्रकांत कापसे**

**नगरसचिव:- विषय क्र. ९)** आर्थिक वर्ष सन २०१९-२० करीता आरोग्य विभागास किरकोळ वाहन दुरुस्ती पोटी तहसलमात प्रतीमहा रु.५०,००० उपलब्ध होणेस व आर्थिक वर्ष सन २०१९-२० प्रतिमहा रक्कम रु.५०,००० x १२ महिने = रु.६,००,०००/- मात्रच्या अपेक्षीत / अंदाजीत खर्चास मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, आरोग्य विभागाकडील शहरातील दैनंदिन कचरा संकलन व वाहतूक करणारी वाहने किरकोळ दुरुस्ती अभावी बंद असतात. (उदा. स्टार्टर रिपेअरींग, अर्ल्टनेटर रिपेअरींग, रेडीयटर रिपेअरींग, जॉईंट क्रॉस रिपेअरीग, हायड्रोलिक पंप / स्टार्टर रिपेअरींग, पाटे दुरुस्ती, बॉडी पॅचवर्क व वेल्डींग इ.) बऱ्याच प्रकारच्या किरकोळ दुरुस्ती अभावी वाहने बंद असलेल्या वाहनांमुळे शहरातील कचरा संकलन व वाहतूकीच्या कामावर विपरीत परिणाम होतो. वाहन व्यवस्था अत्यावश्यक सेवा विचारात घेता आयुक्त यांचेकडील आदेश क्रं. जा.क्र./आस्था/135/ दि.29/05/2019 अन्वये वाहन दुरुस्ती करीता मंजूर केलेल्या रक्कम रु.50,000/- प्रतीमहा तहसलमात / अग्रिमधनातून रोखीने वाहन साहित्य खरेदी व किरकोळ दुरुस्ती करीता मजूरीसह प्रती वाहन रक्कम रु.5000/- पावेतोच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

आरोग्य विभागाकडील वाहन दुरुस्ती खर्च आरोग्याधिकारी यांना मंजूर केलेल्या अग्रिमधन / तहसलमान रु.50,000/- रक्कमेतून करण्यात यावा. तथापी समायोजन, खर्च रक्कमेची वेळोवेळी प्रतिपुर्ती करतांना मुख्यलेखा परिक्षक यांचा अभिप्राय घेवून आरोग्याधिकारी यांच्या मान्यतेने वाहन हिस्ट्री सिट रजिष्टरमध्ये दुरुस्ती देयकांची नोंदी करुन प्रमाणित करुन घेण्यात यावी.

सन- 2019-20 या आर्थिक वर्षाकरिता आरोग्य विभागाकरीता अग्रिमधन तहसलमात रु.50,000/- मात्र आरोग्याधिकारी यांना देणेस व आर्थिक वर्ष सन-2019-20 प्रतीमहा रक्कम रु.50,000 x 12 महिने = रु.6,00,000/- मात्रच्या खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे**

**अनुमोदक :- श्री.मयुर चंद्रकांत कापसे**

**नगरसचिव:- विषय क्र. १०)** जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव हद्दीतील मेलेली जनावरे उचलणे कामी त्यांची विल्हेवाट लावणे कामी मानधनावरील मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांचे नियुक्ती बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १०९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव हद्दीतील मेलेली जनावरे उचलणे करीता मानधनावरील मानसेवी कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे यांची उपायुक्त मनपा जळगांव यांचे आदेश क्र. जा.क्र./आरोग्य वि/2113/2018 दि.06/12/2018 नुसार दि.23/08/2018 ते सहा महिन्याच्या कालावधी करीता सदर कर्मचाऱ्यांकडुन दैनंदिन मेलेली जनावरे उचलणेचे काम करुन घेण्यात येत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका 1949 चे कलम 309 (1) नुसार शहरातील मेलेले जनावरांची प्रेत उचलून त्यांची विल्हेवाट लावणे महापालिकेचे कर्तव्य आहे. मेलेले जनावरे उचलणेचे काम करणारे सफाई कामगार श्री.अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे हे गेल्या 15 ते 16 वर्षापासुन शहरातील मृत जनावरे उचलणेचे काम करीत आहेत.

सदरचे गलीच्छ काम करणेस कोणतेही कामगार तयार होत नसल्याने अत्यावश्यक सेवेची निकड लक्षात घेता स्थायी समिती ठराव क्र.36 दि.15/11/2018 अन्वये श्री. अशोक रामा सोनवणे व श्री.नंदु शहादु नाडे सदर मानसेवी कामगार यांना दरमहा रु.11,000/- मानधनावर शहरातील मृत जनावरे उचलून त्यांची विल्हेवाट लावणे करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम 53 अन्वये अटी शर्तीस अधीन राहुन तात्पुरती नियुक्ती करणेस मान्यता प्रदान केलेली आहे.

सदर कर्मचारी यांची नियुक्ती दि.23/08/2018 पासुन सहा महिने करिता केलेली असून त्यांची मुदत दि.22/02/2019 ला संपलेली असलेने पुर्वीच्या नियुक्ती मध्ये 2 दिवसांचा खंड देवुन दि.25/02/2019 पासुन नव्याने नियुक्ती देणेबाबत तसेच दरमहा सदर कर्मचाऱ्यांना प्रत्येकी रु.11,000/- देण्यात येणारे मानधन देणे संदर्भात स्थायी समिती सभेच्या वेळी चर्चा होवून सभागृहाने घेतलेल्या निर्णयाचे अनुषंगाने सदर दोन्ही मानधनावरील कामगारांचे मानधनात वाढ करुन प्रत्येकी रु.11,000/- ऐवजी रु.14,000/- याप्रमाणे दरमहा मानधन अदा करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदरची दरवाढ ही माहे जुन २०१९ पासून लागू राहील. तसेच सदर सहा (6) महिनेच्या कालावधीसाठी येणारा एकूण खर्च रक्कम रु.1,68,000/- ला मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.सदाशिव गणपतराव ढेकळे**

**अनुमोदक :- श्री.मयुर चंद्रकांत कापसे**

**नगरसचिव:- विषय क्र. ११)** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शिवाजी नगर दुध फेडरेशन रोडवरील खडके चाळ पासून ते सुरत रेल्वे गेट पर्यंतच्या रोडवर दुभाजक बांधणे व रंगकाम करणे कामी मक्तेदार पद्मालया कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेवर ११.५% कमीचे दरास व रक्कम रु.३३,४०,०८२/- मात्रचा खर्च मुलभुत सोई-सुविधा कार्यक्रमा अंतर्गत २५ कोटी निधीतून खर्च करणेस मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.११० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 25 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत शिवाजी नगर दुध फेडरेशन रोडवरील

खडके चाळ पासून ते सुरत रेल्वे गेट पर्यंतच्या रोडवर दुभाजक बांधणे व रंगकाम करणे कामास महासभा ठराव क्रमांक 11 दि. 11/10/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकारीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-2016/प्र.क्रं. 171 (26)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 08/02/2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर कामाचे ई-निविदाव्दारे आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्र. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. 3774104/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | विवेक प्रभाकर खर्चे | निविदा रक्कमेपेक्षा 10% कमीचे दराने | 3396694/- |
| 2 | दि.लॅन्ड मार्क | निविदा रक्कमेपेक्षा 1.35% कमीचे दराने | 3723154/- |
| 3 | श्री प्रविण काशिनाथ राणे | निविदा रक्कमेपेक्षा 0.99% कमीचे दराने | 3736740/- |
| 4 | श्री गजानन एन्टरप्राईजेस<br>प्रो.पा.भग्येश हरि ढाकणे | निविदा रक्कमेवर 1.2% जास्तीचे दराने | 3819393/- |
| 5 | **पद्मालया कंन्स्ट्रक्शन<br>प्रो.पा.अतुल जी.बाहेती** | **निविदा रक्कमेपेक्षा 11.5% कमीचे दराने** | 3340082/- |
| 6 | देवेंद्र अनिल तायडे | निविदा रक्कमेपेक्षा 4% कमीचे दराने | 3623140/- |
| 7 | डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन<br>प्रो.पा.विशाल दगडु पाटील | निविदा रक्कमेइतकेच | 3774104/- |

मक्तेदार **पद्मालया कंन्स्ट्रक्शन** यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपक्षा 11.5% कमीचे कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर 1% पेक्षा जास्त कमीचे दर सादर केलेले असल्याने मक्तेदार **पद्मालया कंन्स्ट्रक्शन** यांनी 2.5% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.824669 दि.12/03/2019 चा रक्कम रु.94400/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे . प्रथम क्रमांकावर असलेले मक्तेदार **पद्मालया कंन्स्ट्रक्शन** यांनी सादर केलेल्या दरानुसार सदर कामी रक्कम रु 3340082/-**मात्र** इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम **रु.** 3340082/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 25 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे.त्यानुसार मक्तेदार **पद्मालया कंन्स्ट्रक्शन यांचे** निविदा रक्कमेपक्षा 11.5% कमीचे दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम रु 3340082/-**मात्र** चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.दिलीप बबनराव पोकळे**
**अनुमोदक :- श्री.भगतराम रावलमल बालाणी**

**नगरसचिव:- विषय क्र. १२)** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत वाल्मीक नगर पुलापासून ते कोळी पेठ पुला पर्यंतच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे व वार्ड क्र.१६ मध्ये श्रीधरनगर जवळील नाल्याला संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार मकरंद दिलीप सुर्यवंशी यांचे निविदा रक्कमेवर ०.१७% कमीचे दरास व रक्कम रु.४५,६३,०७३/- मात्रचा खर्च मुलभुत सोई-सुविधा कार्यक्रमा अंतर्गत २५ कोटी निधीतून खर्च करणेस मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १११ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 25 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत वाल्मीक नगर पुलापासुन ते कोळी पेठ

पुला पर्यंतच्या नाल्यास संरक्षण भिंत बांधणे व वार्ड क्र.16 मध्ये श्रीधरनगर जवळील नाल्याला संरक्षण भिंत बांधणे कामास महासभा ठराव क्रमांक 11 दि. 11/10/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकारीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-2016/प्र.क्रं. 171 (26)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 08/02/2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. त्या नुसार ई-निविदाव्दारे आलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **निविदा रक्कम रु.** 4570843/- | **अपेक्षीत खर्च** |
|---|---|---|---|
| 1 | मकरंद दिलीप सुर्यवंशी | **निविदा रक्कमेपेक्षा 0.17% कमीचे दराने** | 4563073/- |
| 2 | श्री बिल्डर्स & डेव्हलपर्स | **निविदा रक्कमेवर 0.5% जास्तीचे दराने** | 4593697/- |
| 3 | डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन प्रो.पा. विशाल दगडु पाटील | **निविदा रक्कमेवर 1% जास्तीचे दराने** | 4616551/- |

मक्तेदार **मकरंद दिलीप सुर्यवंशी** यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा 0.17% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु 4563073/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम **रु.**4563073/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 25 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे.त्यानुसार मक्तेदार **मकरंद दिलीप सुर्यवंशी यांचे** निविदा रक्कमेपेक्षा 0.17% कमीचे दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम रु 4563073/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.दिलीप बबनराव पोकळे**

**अनुमोदक :- श्री.भगतराम रावलमल बालाणी**

**नगरसचिव:- विषय क्र. १३)** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत फुले मार्केटपासुन ते नेरी नाका ते एस.टी.वर्कशॉप पर्यंतच्या दुभाजकाची उंची वाढविणे कामी मक्तेदार अथंग प्रशांत पारेख यांचे निविदा रक्कमेवर ४.११% कमीचे दरास व रक्कम रु.३२,१०,६९८/- मात्रचा खर्च मुलभुत सोई-सुविधा कार्यक्रमा अंतर्गत २५ कोटी निधीतून खर्च करणेस मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 25 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत फुले मार्केटपासुन ते नेरी नाका ते एस.टी.वर्कशॉप पर्यंतच्या दुभाजकाची उंची वाढविणे कामास महासभा ठराव क्रमांक 11 दि. 11/10/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-2016/प्र.क्रं. 171 (26)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 08/02/2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. उक्त कामांचे 07 मक्तेदाराचे ई-निविदा प्राप्त झालेल्या असून मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| **अ.क्र.** | **निविदा धारकाचे नांव** | **निविदा रक्कम रु.** 3348314/- | **अपेक्षीत खर्च** |
|---|---|---|---|
| 1 | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेपेक्षा 1.26% कमीचे दराने | 3306125/- |
| 2 | देवेंद्र अनिल तायडे | निविदा रक्कमेपेक्षा 4% कमीचे दराने | 3214381/- |
| 3 | **अथंग प्रशांत पारेख** | **निविदा रक्कमेपेक्षा 4.11% कमीचे दराने** | 3210698/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | श्री गजानन एन्टरप्राईजेस पो.पा.भग्येश हरि ढाकणे | निविदा रक्कमेवर 2% जास्तीचे दराने | 3415280/- |
| 5 | प्रवीण काशिनाथ राणे | निविदा रक्कमेवर 2% जास्तीचे दराने | 3415280/- |
| 6 | स्वामी कन्स्ट्रक्शन | निविदा रक्कमेवर 1% जास्तीचे दराने | 3381797/- |

मक्तेदार **अथंग प्रशांत पारेख** यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपक्षा 4.11% कमीचे कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर 1% पेक्षा जास्त कमीचे दर सादर केलेले असल्याने मक्तेदार **अथंग प्रशांत पारेख** यांनी 1% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.017821 दि.13/03/2019 चा रक्कम रु.34000/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे. प्रथम क्रमांकावर असलेले मक्तेदार **अथंग प्रशांत पारेख** यांनी सादर केलेल्या दरानुसार सदर कामी रक्कम रु 3210698/-**मात्र** इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम **रु.** 3210698/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 25 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे.त्यानुसार मक्तेदार **अथंग प्रशांत पारेख यांचे** निविदा रक्कमेपक्षा 4.11% कमीचे दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम रु 3210698/-**मात्र** चे अपेक्षित खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.दिलीप बबनराव पोकळे**
**अनुमोदक :- श्री.भगतराम रावलमल बालाणी**

**नगरसचिव:- विषय क्र. १४)** महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या २५ कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत नॅशनल हायवे नं.६ पासुन ते कब्रस्थान पर्यंत नाल्यास संरक्षण भिंत बाधणे कामी मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे निविदा रक्कमेवर ८.१०% कमीचे दरास व रक्कम रु.९२,१७,८४४/- मात्रचा खर्च मुलभुत सोई-सुविधा कार्यक्रमा अंतर्गत २५ कोटी निधीतून खर्च करणेस मान्यता मिळणेकामी प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, महानगरपालिका क्षेत्रात मुलभुत सुविधांचा विकास कार्यक्रम अंतर्गत शासनाने वितरित केलेल्या 25 कोटी अनुदाना अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत नॅशनल हायवे नं.6 पासुन ते कब्रस्थान पर्यंत नाल्यास संरक्षण भिंत बांधणे कामास महासभा ठराव क्रमांक 11 दि. 11/10/2018 अन्वये उक्त निधी अंतर्गत करण्यास मान्यता देवून जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडेस प्रशासकीस मान्यते करीता शिफारस होणेकारीता मान्यता देण्यात आलेली आहे, त्यानुसार जिल्हाधिकारी, जळगांव यांचे मार्फत विभागीय आयुक्त, नाशिक यांचे कडेस प्रस्ताव सादर करण्यात आला. सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन यांचे कडेस प्रशासकीय मान्यतेकरीता शिफारस देवून उक्त प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक यांचे मार्फत प्रस्ताव सादर करण्यात आला त्यानुसार सदर प्रस्तावास महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे कडील शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-2016/प्र.क्रं. 171 (26)/नवि-16, मंत्रालय, मुंबई दि. 08/02/2019 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. ई-निविदा व्दारे मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु. 10030298/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| 1 | यश बिल्डर्स& कंन्स्ट्रक्शन प्रो.पा.कैलास पंडीत भोळे | निविदा रक्कमेपेक्षा 7.88% कमीचे दराने | 9239911/- |
| 2 | श्री गजानन एन्टरप्राईजेस प्रो.पा.भग्येश हरि ढाकणे | निविदा रक्कमेपेक्षा 1.88% कमीचे दराने | 9841728/- |
| 3 | शिवाजी गणपत भंगाळे | निविदा रक्कमेपेक्षा 8.10% कमीचे दराने | 9217844/- |
| 4 | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेपेक्षा 6.30% कमीचे दराने | 9398389/- |
| 5 | पराग बिल्डकॉन एल.एल.पी. | निविदा रक्कमेपेक्षा 1% कमीचे दराने | 9929995/- |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | देवेंद्र अनिल तायडे | निविदा रक्कमेइतकेच | 10030298/- |

मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपक्षा 8.10% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. सदरचे दर 1% पेक्षा जास्त कमीचे दर सादर केलेले असल्याने मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांनी 1% परफॉर्मन्स सिक्युरिटी चा डी.डी.क्रं.264427 दि.12/03/2019 चा रक्कम रु.105000/- मात्रचा डी.डी.स्कॅन करुन निविदे सोबत सादर केलेला आहे. प्रथम क्रमांकावर असलेले मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांनी सादर केलेल्या दरानुसार सदर कामी रक्कम रु 9217844/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु. 9217844/- मात्र मुलभुत सोई सुविधांचा विकास कार्यक्रमा अंतर्गत 25 कोटी निधीतुन खर्च करावयाचा आहे.त्यानुसार मक्तेदार शिवाजी गणपत भंगाळे यांचे निविदा रक्कमेपक्षा 8.10% कमीचे दरानुसार सदर कामी येणाऱ्या रक्कम रु 9217844/- मात्र चे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.दिलीप बबनराव पोकळे**

**अनुमोदक :- श्री.भगतराम रावलमल बालाणी**

**नगरसचिवः- विषय क्र. १५)** जळगांव शहर महानगरपालिका जळगांव अंतर्गत होणाऱ्या विकास कामांकरीता अंदाजपत्रक तयार करणे, शासकीय स्तरावर तांत्रिक व वित्तीय मान्यता घेणे, कामांचे नियोजन करणे, काम करतांना देखरेख ठेवणे, तांत्रिक सल्ला घेणेसाठी तांत्रिक सल्लागार,वास्तुविशारद प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक करणे कामी वाटाघाटी अंती प्रकल्पाच्या होणाऱ्या किमतीच्या २.५०% शासनाने मंजुर केलेल्या प्रकल्पांकरीता व मनपा स्तरावरील कामांकरीता २% दरास मान्यता देणे व वास्तु शास्त्रज्ञ यांचे पॅनलची ३ वर्ष कालावधीसाठी नियुक्ती करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की,जळगांव शहर महानगरपालिका जळगांव अंतर्गत होणा-या विकास कामांकरीता अंदाजपत्रक तयार करणे, शासकीय स्तराव तांत्रिक व वित्तीय मान्यता घेणे, कामांचे नियोजन करणे काम करतांना देखरेख ठेवणे, तांत्रिक सल्ला घेणेसाठी तांत्रिक सल्लागार, वास्तुविशारद प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नेमणुक करणे कामी महासभा ठराव क्र.19 दि.11/10/2018 रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार आयुक्त मनपा यांचे दि.22/01/2019 च्या मान्यते अन्वये उक्त कामाची ई निविदा सुचना क्रं.1244 सन 2018-19 मनपा च्या संकेत स्थळ www.jcmc.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली. दिलेल्या मुदतीत दि.12/02/2019 पर्यंत 04 ई- निविदा सदर संकेस्थळावर प्राप्त झालेल्या आहे. तसा रिपोर्ट Einternet वरुन दि. 13/02/2019 रोजी घेण्यात आला. तसेच दि.14/02/2019 रोजी घेण्यात आलेल्या रिपोर्टानुसार 03 ई-निविदा आल्याचे नमुद आहे. सदर दिलेल्या मुदतीत नेट वर्कीगची फी तांत्रिक कारणामुळे भरता आलेली नसल्याने आर्किटेक्ट शिरीष बर्वे यांनी सदर फी भरण्यासाठी मुदतवाढ मिळण्याची मागणी केल्यानुसार दि.15/02/2019 दु.03.00 वाजे पर्यंत मुदतवाढ देण्यात आली सदर मुदतीनंतर 04 मक्तेदाराचे प्राप्त झालेले ई-निविदा मधिल तुलनात्मक दर खालील प्रमाणे.

| **निविदा धारकाचे नांव** | जगप्रयाग प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्स्ल्टन, लातुर | द निसर्ग कंन्स्ल्टंसी, नाशिक | द आर्कीटेक (शिरीष बर्वे,जळगांव) | मे.किशोर पाटील असोसिएट, नाशिक |
|---|---|---|---|---|
| | **रस्ते,गटारी,भुमीगत गटारी,पाणी पुरवठा** | **रस्ते,गटारी, भुमीगत गटारी,पाणी पुरवठा** | **बिल्डींग, रस्ते,गटारी, अंतर्गत सजावट,विकासक प्रकल्प** | **बिल्डींग, रस्ते,गटारी, अंतर्गत सजावट,विकासक प्रकल्प** |
| Architectural/ PMC Services | **प्रकल्पाच्या होणा-या** | **प्रकल्पाच्या** | **प्रकल्पाच्या** | **प्रकल्पाच्या होणा-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| up to Tendering and issuance of Work order Stage (as per Scope of work after obtaining all necessary approvals) | **अंदाजित किमतीवर** 1.50% **फी** | **होणा-या अंदाजित किमतीवर** 0.98% **फी** | **होणा-या अंदाजित किमतीवर** 3.05% **फी** | **या अंदाजित किमतीवर** 1.00% **फी** |
| Architectural/PMC Services from work order stage to completion of work (As per Scope of work) | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 2.50% **फी** | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 1.98% **फी** | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 3.05% **फी** | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 1.70% **फी** |

वरील सर्व निविदा धारक यांनी सादर केलेले दर जास्त वाटत असल्याने चारही निविदा धारक यांना दरा बाबत वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेअसता दिलेल्या मुदतीत चारही निविदा धारक यांनी खालील प्रमाणे दर सादर केलेले आहेत.

| **निविदा धारकाचे नांव** | जगप्रयाग प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्स्ल्टन, लातुर | द निसर्ग कंन्स्ल्टंसी, नाशिक | द आर्कीटेक (शिरीष बर्वे,जळगांव) | मे.किशोर पाटील असोसिएट, नाशिक |
|---|---|---|---|---|
| | **रस्ते,गटारी,भुमीगत गटारी,पाणी पुरवठा** | **रस्ते,गटारी, भुमीगत गटारी,पाणी पुरवठा** | **बिल्डींग, रस्ते,गटारी, अंतर्गत सजावट,विकासक प्रकल्प** | **बिल्डींग, रस्ते,गटारी, अंतर्गत सजावट,विकासक प्रकल्प** |
| Architectural/ PMC Services up to Tendering and issuance of Work order Stage (as per Scope of work after obtaining all necessary approvals) | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 0.50% **फी** | **एकुण प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 2% **फी (प्रकल्पाच्या अहवालाच्या कमीत कमी** 15 **कोटी किमतीच्या कामे असतील तर** 2% **फी दराने कामकरणे शक्य होईल)** | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 0.50% **फी** | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 0.50% **फी** |
| Architectural/PMC Services from work order stage to completion of work (As per Scope of work) | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 1.50% **फी** | | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 1.50% **फी** | **प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर** 2% **फी** |
| **एकुण फी :-** | 2% **फी** | 2% **फी** | 2% **फी** | 2% **फी** |
| | | | **शासन स्तरावर मंजुरी,तांत्रीक मंजुरी व इतर शासकीय योजनेतील प्रकल्पांसाठी** 2.50% **फी** | **शासन स्तरावर मंजुरी,तांत्रीक मंजुरी व इतर शासकीय योजनेतील प्रकल्पांसाठी** 2.50% **फी** |

01 ते 04 निविदा धारक यांनी वाटाघाटी आंती प्रकल्प अहवाल तयार करणे व कामांवर तांत्रीक व्यवस्थापन ठेवण्याकरीता एकुण प्रकल्पाच्या होणा-या अंदाजित किमतीवर 2% फी असे दर सादर केलेले आहे. परंतु **अ.क्र.**2 चे निविदा धारक यांनी **प्रकल्प अहवालाच्या कमीत कमी 15 कोटी किमतीची कामे असतील तर 2% फी दराने कामकरणे शक्य होईल** अशी अट दिलेली आहे. **अ.क्र. 01 व 03,04 चे निविदा धारक यांनी प्रकल्पाच्या होणा-या अंदाजीत किमतीवर 2% फी असे दर सादर केलेले आहे.** शासनाने निर्णय क्रमांक संकीर्ण 2018/प्र.क्र.54/नवि-16 /मंत्रालय मुंबई दि.04/06/2018 नुसार निर्धारीत केल्याप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थाम महअभियान अंतर्गत कामांचे प्रकल्प अहवाल तयार करणे त्यास शासन

स्तरावर घ्यावया लागणा-या सर्व मान्यतांसाठी पाठपुरावा करणे, प्रस्तावातील तृटींच्या सर्व स्तरावर पुर्तता करणे प्रकल्पास मान्यता घेवुन सदरच्या कामांचे व्यवस्थापन करण्यासाठी 3% सल्लागार फी निश्चित करण्यात आलेली आहे. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेच्या स्तरावर करावयाच्या कामांसाठी 2% शुल्क निश्चित करण्यात आलेले आहे.प्रस्तावीत प्राप्त झालेले दर शासकीय स्तरावर विविध टप्पे गाठुन कामांना घ्यावयाच्या प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही करणे प्रकल्पचे व्यवस्थापन करणे इत्यादी साठी 2.50% इतके दर प्राप्त झालेले आहे.तसेच स्थानीक स्वराज्या संस्था स्तरावर करावयाच्या कामांसाठी 2% इतके व्यवस्थापन शुल्क आकारण्याचे दर प्राप्त झालेले आहे.सदरचे दर दि.04/06/2018 नुसार शासन निर्णयात निर्धारीत केलेल्या दरा पेक्षा कमी दर असल्याने स्विकारण्यात येत आहेत तसेच सदर दराने काम करण्यास तयार असलेल्या उपरोक्त सल्लागारांना महानगरपालिकेच्या सुचीवर सल्लागार, वास्तु शास्त्रज्ञ म्हणुन 3 वर्ष कालावधीसाठी नियुक्त (पॅनलवर) करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- श्री.दिलीप बबनराव पोकळे**
**अनुमोदक :- श्री.भगतराम रावलमल बालाणी**

**नगरसचिव:- विषय क्र. १६)** सन २०१९-२० या आर्थिक वर्षाकरीता महानगरपालिका अंतर्गत चालणाऱ्या बालवाडीमधील शिक्षिका व मदतनिस यांना दि.१६/०४/२०१९ ते ३१/०५/२०१९ उन्हाळी सुटयातील सेंवा खंडाअंती दि.०१/०६/२०१९ ते ३०/११/२०१९ पावेतो नविन आदेश होणे बाबत तसेच सदर कालावधीतील अंदाजीत मानधन खर्च रक्कम रु.२२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,जळगांव शहर महानगरपालिका बालवाडी विभागातील सेमी इंग्रजी माध्यमाच्या बालवाडीतील २१ शिक्षिका व १० मदतनिस तसेच मराठी माध्यमाच्या बालवाडीतील ९ शिक्षिका व १२ मदतनिस यांचा उन्हाळी सुट्यामुळे सेवा खंड केल्याने नविन नियुक्ती दि.०१/०६/२०१९ ते ३०/११/२०१९ पावेतो मानधन तत्वावर देणेकामी महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५३ मधिल तरतुदी नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच सदर कालावधीतील अंदाजीत मानधन खर्च रक्कम रु.२२,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**
**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सौ.उज्वला मोहन बेंडाळे**
**अनुमोदक :- सौ.शुचिता अतुलसिंह हाडा**

**नगरसचिव:- विषय क्र. १७)** अध्यक्ष संघर्ष अपंग कल्याण बहुउद्देशिय संस्था यांना संत गाडगेबाबा संकुलातील गाळा भाडे तत्वाने देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की,अध्यक्ष संघर्ष अंपग कल्याण बहुउद्देशिय संस्था यांनी अपंग करीता ३ टक्के निधी अंतर्गत सहाय्य करणेबाबत व अपंगांना स्वावलंबी करणे करीता महानगरपालिकेच्या हद्दीतील रेल्वे स्टेशन परीसर व इतर ३ ठिकाणी नमूद पैकी एका ठिकाणी झुणका भाकर केंद्राकरीता जागेची मागणी केली होती त्यापैकी नगररचना विभाग यांनी अध्यक्ष संघर्ष अपंग कल्याण बहुउद्देशिस संस्था यांना झुणका भाकर केंद्राकरीता संत गाडगेबाबा संकुलातील एक गाळा भाडे तत्वाने देणेबाबत शिफारस केलेली असुन त्याअनुषंगाने अध्यक्ष संघर्ष अपंग कल्याण बहुउद्देशिय संस्था यांना नियमानुसार भाडेतत्वाने देणेसाठी नगररचना विभागाने खालील प्रमाणे भाडे दर ठरवून दिलेले आहेत,

| अ.क्र. | संकुलाचे नांव | मजला | गाळा क्रं. | क्षेत्रफळ चौ.मी.) | वार्षिक भाडे |
|---|---|---|---|---|---|
| १ | **संत गाडगेबाबा संकुल** | तळ | --- | १६.३१ | ९२४२० |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ८ मधिल कलम ७९ (ड) (नगरपालिकेच्या मालमत्तेचा विनियोग करण्यासंबंधी तरतूदी) मध्ये नमूद केल्यानूसार तसेच शासनाचे धोरणाप्रमाणे ३ टक्के जागा अपंगांना आरक्षीत ठेवणेबाबतची तरतूद असल्याने प्रस्तावित केलेला गाळा अंपगाकरीता आरक्षीत ठेवुन जाहिर लिलाव करुन भाडे पट्टयाने देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सौ.शुचिता अतुलसिंह हाडा**
**अनुमोदक :- सौ.उज्वला मोहन बेंडाळे**

**नगरसचिव:- विषय क्र. १८)** जळगांव शहरातील मनपा मालकीच्या बगीच्यात /ओपन स्पेस मध्ये ओपन जीम साहित्य बसविणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,राज्यात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी पोषक वातावरण असणे आवश्यक आहे. याच भूमिकेतून राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ घोषित करण्यात आले असून, त्याची अंमलबजावणी करण्याबाबत दिनांक : १४/०६/२०१२ चा शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. या क्रीडा धोरणातील व्यायामशाळा विकास अनुदान योजनेत सुधारणा करण्याबाबत आहे. सदर शासन निर्णयातील "परिशिष्ट-अ" मधील नियम क्र.३ मध्ये अनुदानाच्या बाबी या खाली "क्र.४ खुली व्यायामशाळा उभारणे" या बाबीचा समावेश करण्यात आलेला आहे. अनुदान मंजुरीच्या अटींमध्ये शासनाने खालील अटी अंतर्भूत करण्यास मान्यता दिलेली आहे.

**अटी-शर्ती :-**

१) खुल्या व्यायामशाळेच्या उभारणीकरिता संस्थेच्या मालकीची किमान १००० चौ. फुट मोकळी जागा, सार्वजनिक मोकळी जागा, उद्याने विविध क्रीडांगणे या ठिकाणी प्राधान्याने अनुदान देण्यात येईल. ज्या संस्थेकडे १००० चौ. फुट चटई क्षेत्रात तारेचे कुंपण (चॅनलिंक फेन्सिंग) सह मोकळी जागा असल्यास खुल्या व्यायाम शाळेच्या व्यायाम साहित्यासाठी प्राधान्याने अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

२) सदर व्यायामशाळेतील साहित्याची देखभाल व दुरूस्ती करण्याची जबाबदारी याबाबतचा ठराव. (प्रोसिडींग बुकाची झेरॉक्स प्रत)

३) संस्था / ग्रामपंचायत / नगरपरिषद / नगर पालिका / महानगरपालिकाने यापुर्वी कोणत्याही शासकीय अनुदानातून व्यायाम साहित्य खरेदी केलेले नाही याबाबतचे हमीपत्र.

४) खुली व्यायामशाळेकरीता अंदाजपत्रकात व्यायाम साहित्य जोडणी (फींडीग) जमिनीतील फाँन्डेशनसह करणे आवश्यक आहे. सदर सिव्हील कामाच्या अंदाजपत्रकात समावेश करावा.

उपरोक्त शासन निर्णयातील अटी व शर्ती नूसार जळगांव शहरातील बगीचे व ओपन स्पेस (ज्या जागेस कुंपण / तारेचे अथवा चॅनलिंक कुंपण अशी जागा) ठिकाणी ओपन जीम साहित्याकरीता जिल्हा क्रिडा अधिकारी, जळगांव यांचे कडे अनुदान मागणी करीता प्रस्ताव पाठविणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन पूढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**
**सुचक :- सौ.शुचिता अतुलसिंह हाडा**
**अनुमोदक :- सौ.उज्वला मोहन बेंडाळे**

**नगरसचिव:- विषय क्र. १९)** महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१७/०९/२०१८ ते दि.२१/०९/२०१८, दि.२४/०९/२०१८ ते दि.२८/०९/२०१८, दि.०१/१०/२०१८ ते दि.०६/१०/२०१८ अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेंत येत आहे की ,महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१७/०९/२०१८ ते दि.२१/०९/२०१८, दि.२४/०९/२०१८ ते दि.२८/०९/२०१८, दि.०१/१०/२०१८ ते दि.०६/१०/२०१८ अखेर संपणाऱ्या लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेतली .

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सौ.शुचिता अतुलसिंह हाडा**

**अनुमोदक :- सौ.उज्वला मोहन बेंडाळे**

**नगरसचिव:- विषय क्र. २०)** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ११९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१) प्रशासकीय आदेश क्रं./१२०/दि.१२/०२/२०१९ अन्वये खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०९ मध्ये पिंप्राळा गट नं.४/१+२ साईबाबा परिसर गट नं.११ व १२ दांडेकर नगर पिंप्राळा रोड परिसरामध्ये आर.सी.सी.गटार बांधकाम करणे कामी मक्तेदार श्री.सुनिल एन पाटील,जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.९,९०,००३/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.ख.श्री.ए.टी.(नाना)पाटील)

२) प्रशासकीय आदेश क्रं./१३१/दि.१२/०३/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.११ पिंप्राळा गट नं.१५६/२ येथील महानगरपालिकेच्या मोकळया जागेस वॉलकंपाऊंड करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील, कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रक्कमेइतकेचचे सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.७,९९,७९०/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

३) प्रशासकीय आदेश क्रं./१३२/दि.२६/०३/२०१९ अन्वये जळगांव शहरातील डांबरी रस्ते पॉटहोल मशिनच्या सहाय्याने दुरुस्ती करण्याकरीता इमल्शन डांबर पॅक डब्यात शासकीय दराने हिदुस्थान कोलॅस प्रा.लि.मुंबई यांचे कडुन खरेदी करणे कामी रक्कम रु.१०,२९,४८०/- + अंदाजे वाहतुक खर्च रक्कम रु.८४,७८८/- असा एकुण रु. ११,१४,२६८/- मात्र खर्चाची संविंदा.

४) प्रशासकीय आदेश क्रं./०१/दि.२६/०४/२०१९ अन्वये खासदार स्थानिक कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील शिंदे नगर, पिंप्राळा परिसर येथे गट क्र.२/२ब/२ मध्ये मनपा मालकीचे खुल्या जागेवर सभामंडप बांधकाम करणे कामी मक्तेदार सुनिल एन पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.१% सर्वात कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.६,९९,१५८/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.खा.श्री.ए.टी.(नाना) पाटील)

५) प्रशासकीय आदेश क्रं./०२/दि.२३/०५/२०१९ अन्वये आमदार स्थानिक कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.०७ यशवंत कॉलनी येथिल महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागेवर (सि.स.न.७२१४ अ) पाथवे तयार करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेइतकेच दर योग्य व वाजवी स्विकारुन रक्कम रु.९,७७,७८१/- मात्र आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत व उर्वरित निधी रक्कम रु.८,७३०/- मात्र मनपा निधीतुन करावयाची खर्चाची संविंदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

६) प्रशासकीय आदेश क्रं./०८/दि.२८/०५/२०१९ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग समिती क्रं.०४ अंतर्गत डांबरी रस्ते दुरुस्त करणे कामी मक्तेदार श्री.शिवाजी गणपत भंगाळे यांचे निविदा रक्कमेवर १०% जास्तीचे दर सर्वात कमीचे स्विकारुन रक्कम रु.२४,४९,६९५/- मात्र खर्चाची संविंदा.

७) प्रशासकीय आदेश क्रं./०३/दि.२४/०५/२०१९ अन्वये प्रभाग समिती क्र.०४ मधील नाल्याचा काढलेले गाळ गवत झाडे झुडपे इत्यादी मक्तेदाराने स्वत:चे वाहने (ट्रॅक्टर, डंपर इत्यादी) लावुन नाल्याच्या काठावरुन मनपा सांगेल त्या जागी वाहतुक करुन टाकणे कामी मक्तेदार कु.दामिनी रविंद्र चौधरी, जळगांव यांचे आलेले निविदा रक्कमेइतकेचेच दर योग्य व वाजवी स्विकारुन रक्कम रु.१,११,९८३/- मात्रचे खर्चाची संविंदा.

८) प्रशासकीय आदेश क्रं./०४/दि.२४/०५/२०१९ अन्वये प्रभाग समिती क्र.०४ अंतर्गत सुरेश नगर पासुन ते दिपक फुड पर्यंतचा नाला मक्तेदाराने स्वत:च्या जेसीबी मशिनने गाळ, गवत झुडपे इत्यादी काढुन साफसफाई करणे कामी मक्तेदार कु.दामिनी रविंद्र चौधरी, जळगांव यांचे आलेले निविदा रक्कमेइतकेचेच दर योग्य व वाजवी स्विकारुन रक्कम रु.२९८७०४/- मात्रचे खर्चाची संविंदा.

९) प्रशासकीय आदेश क्रं./०९/दि.०४/०६/२०१९ अन्वये जळगांव शहर महानगरपालिका क्षेत्रातील सुविधांची / तक्रार निवारणासाठी कॉल सेंटर चालविण्यासाठी अभिकर्त्याची नियुक्ती करणे कामी मक्तेदार ओमीज सोल्युशन प्रा.लि.नाशिक यांचे १२ महिन्याकरीता प्रती महा रक्कम रु.४०,९००/- प्रमाणे रक्कम रु.४,९०,८००/- मात्र खर्चाची संविंदा.

१०) प्रशासकीय आदेश क्रं./१०/दि.१३/०६/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०५ अंतर्गत सी.टी.एस.नं.१९८१ (पार्ट) येथील महानगरपालिका मालकीच्या जागेमध्ये पुर्वेकडील संरक्षण भिंत बांधणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ०.९९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.५,६४,५६०/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

११) प्रशासकीय आदेश क्रं./११/दि.१३/०६/२०१९ अन्वये नाविण्यपुर्ण योजना सन २०१८-१९ अंतर्गत जळगांव शहरातील जळगांव न.भू.क्र.७४४१, ७४८६,२६७० भाग व २१२० भाग येथे सार्वजनिक शौचालये बांधणे कामी मक्तेदार विलास प्रभाकर पाटील यांचे निविदा रकमेपेक्षा १०% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.२२,३४,७९७/- मात्र खर्चाची संविंदा.

१२) प्रशासकीय आदेश क्रं./१२/दि.१३/०६/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१९ सुप्रिम कॉलनी मेहरुण शिवार स.क्र.१८३ मधील महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागेस (गट क्र.१८३/पै/ओपनस्पेस) कुंपण भिंत बांधणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ०.९९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१४,८४,०२४/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१३) प्रशासकीय आदेश क्रं./१३/दि.१३/०६/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१९ मेहरुण सुप्रिम कॉलनी अंतर्गत स.क्र.१८१/१ मधील महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागेस (गट क्र.१८१/१/ओपनस्पेस) कुंपण भिंत बांधणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ०.९९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१४,८४,५२०/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१४) प्रशासकीय आदेश क्रं./१४/दि.१३/०६/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.१७ स.क्र.१३६/१+२+६/१ जळगांव शिवार लिलापार्क जवळील महानगरपालिका मालकीच्या (गट क्र. १३६/१+२+६+७/१ खुली जागा) खुल्या जागेस कुंपण भिंत बांधणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ०.९९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१२,३८,०५०/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१५) प्रशासकीय आदेश क्रं./१५/दि.१३/०६/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०६ अंतर्गत आंबेडकर मार्केट लगत टि.पी.२ फाईनल प्लॉट नं.३८१ (अ) मनपा मालकीच्या खुल्या जागेत कॉक्रीटीकरण करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ०.९९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.१४,७५,७२५/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१६) प्रशासकीय आदेश क्रं./१६/दि.१३/०६/२०१९ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.२३ मधील महानगरपालिका मालकीच्या खुल्या जागेस (सर्व्हे नं.११५/१ अ २) आरक्षण भिंत बांधकाम करणे व जॉगींग ट्रॅक करणे कामी मक्तेदार डि.एच.पाटील कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ०.९९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.७,९१,६४९/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

१७) प्रशासकीय आदेश क्रं./१७/दि.१३/०६/२०१९ अन्वये खासदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील मातोश्री प्राथमिक विदया मंदिर, आहुजा नगर,जळगांव या विदयालयासाठी वॉल कंपाऊंड (संरक्षण भिंत) बांधकाम करणे (गट क्र.१२२/२/१/ओपन स्पेस मधील प्रबोधन संस्थेच्या जागेवर) कामी मक्तेदार डि.एच.पाटील

कंन्स्ट्रक्शन यांचे निविदा रकमेपेक्षा ०.९९९% कमीचे दर स्विकारुन रक्कम रु.९,८८,३७६/- मात्र खर्चाची संविंदा. (मा.खा.श्री.ए.टी.(नाना)पाटील)

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- सौ.शुचिता अतुलसिंह हाडा**

**अनुमोदक :- सौ.उज्वला मोहन बेंडाळे**

**नगरसचिव :- जादा विषय क्र.०१ :-** दैनिक बाजार / आठवडे बाजार / कोंबडी बाजार वसुली मक्ता कामी मक्तेदार यांनी दिलेली देकार रक्कम रु.१,५४,००,०००/- मान्य करणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर निर्णय घेणे.

श्री.नितीन लढढा :- आयुक्त साहेब या मक्त्याच्या अनुषगांने एक वस्तुस्थिती आपल्या निदर्शनास आणायची आहे. जाहीरात कर वसुलीच्या संदर्भातला मक्ता सन २०१० ते २०१३ या तिन आर्थिक वर्षासाठी जाहिर निविदा द्वारे मक्तेदाराला दिलेला होता. त्या तीन वर्षाचे उत्पन्न महानगरपालिकेला वार्षिक रु.६३,११,१११/- प्रति वर्ष आणि तीन वर्षासाठी रु.१,८९,३३,३३३/- उत्पन्न आपल्याला मिळालेले होते. सन २०१३ ला मक्त्याची मुदत संपुन गेली . मुदत संपल्यानंतर पुन्हा हा मक्ता आपण जाहिर निविदाच्या दृष्टीकोनातुन प्रस्ताव सभागृहासमोर आलेला होता. परंतु तत्कालीन प्रशासनाने रु.१ कोटी ८९ लाखाच्या त्या मक्त्यामध्ये अजुन दरवाढ सुचवुन त्याचे up set price खुप अवास्त प्रमाणात वाढविलेली होती. आणि अवास्त असल्या कारणाने त्या मक्त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्या मक्त्याला प्रतिसाद न मिळाल्यामुळे नंतर प्रशासनाने ही प्रयत्न केला नाही. परंतु मागील सन २०१३-१४, सन २०१४-१५ आणि सन २०१५-१६ मध्ये जे उत्पन्न झाले ते म.न.पा.स्वताच्या कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन वसुल करत होती. त्याची आकडेवारी पहिल्या सन २०१३-१४, सन २०१४-१५ आणि सन २०१५-१६ अनुक्रमे सन २०१३-१४ मध्ये रु.३२,९२,७६५/-, सन २०१४-१५ मध्ये रु.३७,५२,४१५/- व सन २०१५-१६ मध्ये रु.४९,३७,१४८/- अशी या तीन वर्षाची सरासरी एकुण रु.१,१९,८२,२२८/- आहे. याच्यापुर्वी दिलेला मक्त्याचे अनुषंगाने यात वाढ होणे अपेक्षित असतांना रु.१ कोटी ८९ लाखाच्या तुलनेमध्ये राबविलेल्या उपक्रमात प्राप्त झाले १ कोटी १९ लाख रुपये, साधारणता ६९ लक्ष रुपये त्या तीन वर्षात महानगरपालिकेला तोटा झाला. तद्नंतरचे वर्ष सन २०१६-१७, सन २०१७-१८ आणि सन २०१८-१९ या तीन वर्षांमध्ये मागील उत्पन्नापेक्षा ही जास्त घट झालेली आहे. मक्तेदाराशी तुलना केली तर खुपच कमी आहे. परंतु मागील तीन वर्षाची तुलना जर केली तर ज्यावेळेला मागच्या वर्षी रु.१,१९,८२,२२८/- तीन वर्षाचा उत्पन्न आलेले होते. नंतरच्या सन २०१६-१७, सन २०१७-१८ आणि सन २०१८-१९ या तीन वर्षांमध्ये रु.१,१७,५४,११५/- म्हणजेच मागच्या वर्षांमध्ये उत्पन्न वाढण्या ऐवजी घट झालेली आहे. आणि १ कोटी ८९ लक्षाच्या तुलनेत जर सांगितले तर रु.७१,७९,२९७/- कमी आले.म्हणजे ठेक्यात पुर्ण सहा वर्षात जर बघितले तर साधारणता रु.१,४१,३०,३८४/- च्या उत्पन्नाला ही महानगरपालिका मुकली गेली. हा झाला एक Aspect या विभागासाठी आस्थापना मधुन जो खर्च होतो तो खर्च अजुन आपण या संबंधीत केलेला नाही. कारण मक्ता असतांना आपल्या कर्मचाऱ्यांची तेथे काम करण्याची जबाबदारी नसते. त्या कर्मचाऱ्यांची जबाबदारी आपण दुसऱ्या विभागात ठेवु शकतो. हे उत्पन्नाचे खरे स्त्रोत आहे. परंतु आपण उत्पन्नाच्या स्त्रोताकडेच लक्ष देणार नाही तर ही परिस्थिती वर्षानुवर्ष अशीच बिकट राहील. प्रशासकीय सेवेसोबत व्यवहारीक दृष्टीकोन सुध्दा अपेक्षित असतो. फक्त कायदा, पुस्तक आणि प्रशासकीय भुमिका आणि त्याच्यावर अवलंबुन राहिल्याने हे जे नुकसान झालेले आहे. १ कोटी ८९ लक्ष ज्या मक्तेदाराने दिले त्याच्याशी चर्चा केली असता, त्यानी खुप त्यातुन Profit कमविले असे नव्हते. साधारणता मक्तेदाराची ही अपेक्षा होती की त्याच रक्कमेत जर पुढच्या तीन वर्ष मक्ता दिला तर आमचा Survive होऊ शकतो. नैसर्गीक न्याय हे आहे की तुम्ही किंमत वाढवुन बघा नाही प्रतिसाद मिळाला तर किंमत कमी करा.

मा.आयुक्त :- अतिशय गंभिर बाब आहे.

श्री.नितीन लढढा :- गाळे हस्तांतरणाची मुदत संपुष्टात आलेली आहे. जवळपास आपले २१ मार्केट जे आहे त्यांच्या मुदतीही संपलेल्या आहे. त्या व्यतिरिक्त गोलाणी मार्केट आहे, बी.जे.मार्केट आहे असे काही व्यापारी संकुल आहे की ज्यांच्या मुदती संपुष्टात आल्या नाही. परंतु मोठया प्रमाणावर त्यांचे हस्तांतरण झालेले आहे. हस्तांतरण फीचा केलेला ठराव तत्कालीन आयुक्तांनी विखंडनासाठी पाठविला होता. परंतु हस्तांतरण प्रक्रिया जवळपास ४-५ वर्षापासुन बंद आहे. आणि या काळात अनंत व्यवहार अनेक वेळा Transfer झाले. मी गाळा घेतला मी विष्णु सेठला विकले, त्यांनी नितीन बरडेंना विकले आणि आज ही तो गाळा माझ्या नांवावरती आहे. Mutual understanding मध्ये हस्तांतरण होत आहे. त्यामुळे कमीत कमी ४ ते ५ कोटी रुपये मिळेल जर महानगरपालिकेने एक व्यवहारीक भुमिका घेऊन असे पध्दतीचा प्रस्ताव मंजुर केला तर साधारणता ४-५ कोटीचे उत्पन्न मिळेल.

मा.आयुक्त :- या संदर्भात आपल्याला कुठलेही हस्तक्षेप करता येणार नाही. यात Legal Aspects खुप आहे.

श्री.नितीन लढढा :- महासभेत येतांना एक तक्रार आली होती की जे काम शुन्य कन्सलटंट एजन्सी म्हणुन करते. त्याच्या माध्यमातुन गेल्या तीन वर्षापासुन तो कन्सलटंटच्या हाता खाली आहे आणि तश्या वेळेला तो सुध्दा एक ॲप्लीकंट होता आणि त्याला कुठे काहीच नसल्या कारणाने किंवा याच महानगरपालिकेमध्ये ३ वर्षाचा अनुभव असतांना कोणीतरी नागपुरच्या सतिष गडगे म्हणुन यांना नियुक्ती देण्यात आली.

मा.आयुक्त :- Post Suitable Candidate असे प्रकारे तो निर्णय घेतलेला आहे.

श्री.नितीन लढढा :- आम्हाला असे वाटत आहे की, या विषयात काही आर्थिक व्यवहार झालेला आहे.

मा.आयुक्त :- याच्यात कुठल्याही प्रकारचा आर्थिक व्यवहार झालेला नाही. प्रत्येक Candidate ला असे वाटते की, आपले Selection व्हायला पाहिजे. आणि मग आरोप सुरु होतात. या मध्ये कुठलाही गैरव्यवहार झाला नाही. आम्ही प्रयत्न असे करत होतो की, ज्या दिवशी इंटरव्हीयु होतील त्याच दिवशी ऑर्डर द्यायची पण काही तांत्रिक अडचणी आलेल्या होत्या. आणि एकाच जागेसाठी सात लोकं असतील तर एकाचीच नियुक्ती होणार.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. १२० पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, जा.क्र.कि.व.वि./२३३३/२०१८-१९ दिनांक ०९/०१/२०१९ रोजी स्थायी समिती समोर दैनिक बाजार वसुली कामी मक्तेदार श्री.सोनवणे कैलास निवृत्ती रा.पंचवटी नाशिक यांनी वसुली कामी दिलेली देकार रक्कम रु.१,४०,११,१११/- स्विकारणे साठी स्थायी समिती समोर डॉकेट सादर केले असता स्थायी समितीने सदरची निविदा नाकारुन स्थायी समिती ठराव क्र.७६ दिनांक २२/०१/२०१९ पारीत करुन सदर ठरावात अटी शर्तीमध्ये दुरुस्ती करुन मक्तेदारास वसुलीचा अनुभव असणे व तसेच मक्तेदारास देय असलेली रक्कम अदा न केल्यास दररोज रु.१०००/- दंड करावा व दंडाची रक्कम रु.१०,०००/- अशी झालेवर मक्ता रद्द करावा . सदरची निविदा कालावधी हा दोन वर्षाचा राहील पुढील वर्षी १० टक्के इतकी वाढ करण्यांत यावी. तसेच निविदाची देकार रक्कम रु.१,४१,००,०००/- (एक कोटी ऐक्केचाळीस लक्ष) असा ठराव करण्यांत आला त्यानुसार निविदा अटीशर्ती मध्ये सुधारणा करुन नव्याने निविदा प्रसिध्द करण्यांत आली असता स्थायी समितीने निश्चित करुन दिलेली निविदा देकार रक्कम रु.१,४१,००,०००/- (एक कोटी ऐक्केचाळीस लक्ष) या रक्कमेवर दोन वेळा निविदा प्रसिध्द करुन कोणीही निविदेत भाग घेतला नाही. पुनश्य: तिसरी फेर निविदा प्रसिध्द केली असता एक निविदा धारकाने सदर निविदेत भाग घेतला आहे. दिनांक १४/०६/२०१९ रोजी निविदा समितीच्या परवानगीने तांत्रिक कागदपत्राचा लिफाफा क्र.१ उघडयांत आला असता त्यात श्री.किरण शंकरराव भालोदकर राहणार रीधुर वाडा, शनिपेठ,जळगांव यांनी निविदेतील अटी शर्तीनुसार आवश्यक लागणारे कागद पत्राची पुर्तता केलेली आहे. त्यांनी संपुर्ण कागदपत्रांची पुर्तता केल्याने नियमानुसार पुनश्च: निविदा समिती यांची पुर्व परवानगी घेवुन लिफाफा क्र.२ देकार रक्कमेचे पाकीट उघडण्यांत आले असता श्री.किरण शंकरराव भालोदकर यांनी वित्तीय देकार रक्कम रु.१,५४,००,०००/-(अक्षरी – एक कोटी चौपन्न लाख) अशी दिली असुन त्यांनी दिलेले दर रु.मनपाने प्रस्तावित केलेल्या देकार रक्कम रु.१,४१,००,०००/- दरापेक्षा रु.१३,००,०००/- (तेरा लाख रुपये) जास्त आहे. तरी त्यांनी दिलेली देकार रक्कम जास्तीची असल्याने ती स्विकृत करणेस व मक्तेदार श्री.किरण शंकरराव भालोदकर यांना वसुली कामी कार्यादेश देणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

सदर देकार हा एक वर्षाकरिता असल्याने पुढील वर्षी सदर देकार रक्कम निविदेतील अटी शर्ती प्रमाणे १० टक्के वाढ करुन निश्चित करणेत यावा.

सदर प्रकरणी प्रशासनाने नियमानुसार शासन आदेश/निर्देशानुसार आवश्यक त्या बाबींची पुर्तता करुन घ्यावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- श्री.भगतराम रावलमल बालाणी**

**अनुमोदक :- श्री.सुनिल वामनराव खडके**

राष्ट्रगीता नंतर येणे प्रमाणे सभेचे कामकाज संपन्न झाले.

**सही/-**

**सभापती**

**स्थायी समिती**

**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**